ने. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ... नाटक
दा. क्र. १८८७६

IRBK-0118876

IRBK-0118876

भल्याकाका

नाटक
९८८७६
20।८।९

# भल्याकाका

विजय तेंडुलकर

IRBK-0118876
IRBK-0118876

अमेय प्रकाशन

© विजय तेंडुलकर

---

प्रयोगाच्या परवानगीसाठी
विजय तेंडुलकर
कुमार दोन
हनुमान रस्ता
विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४००-०५७

---

प्रकाशक
मनोहर पिंपळापुरे
अमेय प्रकाशन
रुईकर मार्ग
नागपूर २

---

मुद्रक
मधुसूदन वनहट्टी
नारायण मुद्रणालय
धंतोली, नागपूर १२

---

मुखपृष्ठ
वसंत सरवटे

---

प्रकाशन क्रमांक
सोळा
किंमत
आठ रुपये पन्नास पैसे

म. ग्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १८८७६ नों. दि २०।८।७
वि. नाटक क्र.

ज्यांच्यामुळे मला
भल्याकाका, सखाराम बाइंडर
यांसारखी
जगावेगळी माणसे भेटली
ते माझे स्नेही
**श्री. रामकृष्ण विष्णू जोशी**
यांना कृतज्ञतापूर्वक.

लेखक

'भल्याकाका' या नाटकाचा पहिला प्रयोग 'नाट्य-मंदार' मुंबई, या संस्थेने शिवाजी मंदिर, मुंबई येथे दि. ५–४–७२ रोजी सादर केला.

## प्रथम प्रयोगाचे मानकरी

| | |
|---|---|
| दिग्दर्शक | अरविंद देशपांडे |
| नेपथ्य | रघुवीर तळाशीलकर |
| प्रकाश योजना | राम शितुत |
| संगीत | शशांक लालचंद |
| वेशभूषा | रामचंद्र घाडी |
| रंगभूषा | बाबा वर्दम, प्रकाश तवडे |

## भूमिका

| | |
|---|---|
| बाप्या | विलास वंजारी |
| बाई | अनुराधा |
| भल्याकाका | दत्ता भट |
| फिर्यादी | महेशकुमार नमशीकर |
| चोर | विश्वास पटवर्धन |
| बाई २ | संध्या रायकर |
| इन्सपेक्टर भोसले | यशवंत दत्त |
| जावई | सतीश राजमाचीकर |
| गोदू | सौ. सुहासिनी देशपांडे |
| इसम | खांडेकर |
| एकजण | रमेश आयरे |
| कॉन्स्टेबल | सुबोध वैद्य |
| | आणि इतर. |

नाट्य परिनिरीक्षण मंडळाचा क्रमांक
DRM–665/72
12–4–72

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ९८८७६ नों. दि. २०।८।९
वि. ना।८९ भा.

# अंक पहिला

[ १९४७-४८ साल. मोठ्या गावाच्या आसमंतातली **एक पोलिस चौकी**. चौकीला बाहेरच्या बाजूला दोन माणसे गर्दीने झोपू शकतील एवढा कट्टा. समोर चौकीचा आतला दर्शनी भाग. या भागात एक जुनाट टेबल-खुर्ची, एक स्टूल, एक बाकडे, काही काळ्या ट्रंका, कोपऱ्यात लाकडाची एक जुनाट घडवंची. तिच्यावर पिवळ्या कागदाच्या थप्प्या लागलेल्या. एक खुंटी. तिला एक पोलिसी पट्टा, एक पोलिसीच दांडके.

पडदा दूर होतो तेव्हा चौकीत काळोख. प्रेक्षकांच्या उजवीकडच्या म्युनिसिपल दिव्याचा काही उजेड आत घरंगळला आहे तेवढाच.
मधून मधून आभाळात वीज चमकते, आवाज न करता.
लांबवर कुत्री रडत आहेत. तितकेच लांबवरून एक सामुदायिक भजन ऐकू येते अगदी अस्पष्ट. मग मध्येच जंगलात असते तसली नीरव शांतता. पुन्हा कुत्र्याचे भुंकणे.

आणि दोन जण प्रवेश करतात. एक बाप्या. दुसरी बाई. दोघे भणंग, गावराण, भटकी. अंगावर घोंगडी. ]

**बाप्या** (टेहळणी करीत पुढे येतो. चौकीच्या दिशेने जरा वास घेतल्यासारखा करतो आणि मग) हा, ये अशी. ठ्येव त्ये गठुडं हितं. (स्वतः कट्ट्यावर टेकतो आणि दम टाकतो.) बस. रातला परतून पाऊस यील वाटतोय. पावसानं भारीच दम काल्डा बा आज. रात हितंच काडावी ह्ये बरं.

**बाई** काय हाय रं ह्ये ? ग्येटावाणी दिसतंया.

**बाप्या** हागं ग्येटच हाय नि काय !

**बाई** (कण्हून) ग्ये–ट ! आरं माज्या देवा—(गाठोडे उचलून पळू लागते.)

**बाप्या** (तिला अडवून) आगं दम. चाललीस खुटं ? रात किती झाली, गाव बी लई लांब हाय. दुकानाची फळीबी न्हाई खुटं निवाऱ्याला. बंगले–तेबी लांब हायती पार तिकडं. आन गुरखे न कुत्री असत्यात बंगल्याला –आयला लई वंगाळ जात. आन आबाळ परतुन भरलंय बग पावसानं. हितंच बेश हाय. (अंगाभोवतालचे घोंगडे काढून बसल्या बसल्या जरा अंग ताणतो. प्रशस्त बसतो.)

**बाई** बेश ? आरं माज्या कर्मा. आरं ग्येटावर आपल्यावाणी मान्सं झोपाय लागली म्हंजी—

**बाप्या** (अडवून) गुमान बस बगू हितं. आगं ग्येट काय खातंय आपल्याला ? आ ? ग्येट बी आसतंय आणिक आपुनबी आसतोयच की.

**बाई** न्हाऽी, खात न्हाऽी, पकडतंय. जेलात घालतंय. आपुन कोन त्ये अिसरलास का काय मुड्या ? चल, मला—

**बाप्या** (तिला सक्तीने बसवून) आऽीक माजं. रातीचं हितंच बेश हाय. उगा पावसात चिप्प भिजावं लागंल कावळ्या कुत्र्यावाणी. आताच बग हुडहुड करतंय आयला आंग. भारी गारठा. (खमीसातून विडी शोधून काढून शिलगावतो. मग खोकल्याची ढास देऊन) हितं काय बी धोका न्हाऽी. हितं डूटीला कोन असतोय, ठाव हाय तुला ? द्येवमानूस हाय द्येवमानूस, भल्याकाका म्हंजी. न्हवं, द्येवच तसबिरीतला. नाकावरची माशी बी दुखवायचा न्हाऽी गडी. धा मैलात झाडून सम्दं चोरचिलट नाव घेतंय बग त्येचं. व्हय. आज त्यो...आपला हा सांगत हुता—

**बाई** आरं पर खातरी काय त्येची ! आलं डोक्शीमंदी त्येच्या तर फुकाट—

**बाप्या** डोक्शीत ? कुनाच्या ? भल्याकाकाच्या ? आगं काय येडं का खूळं ! आ ? भल्याकाकाच्या डोक्शीत काय बी येत न्हाई. त्येला सप्नं पडत्यात सप्नं. रातची न् दिसाची बी. झोपंमंदी न जागपनी बी. आन कंदीबी झोप येती गपगार. झोपला का गडी आऊट. धा जल्मं पुन्य संपादण करावं न भल्याकाकाच्या ग्येटावर यावं आसं म्हनत्यात सम्दे आपले धंदेवाले. तर ! बस तू काय धाबरू नगं. मी हाय.

**बाई** आरं पर ह्ये गठुडं—

**बाप्या** बगू काय हाय त्यामंदी ?

**बाई** (दूर होत गाठोडे अंगाशी घट्ट धरून) नगं. कोन बघंल.

**बाप्या** (चौकीत एकदा डोकावल्यासारखे करून सुगावा घेत) हाय कोन पघायला बा ? भल्याकाकाबी ग्येला जनू खुटं. का वर हाय ? (कान देतो.) छ्या. गडी लपायचा न्हाई. झोपला का ढाण्या वाघावाणी घोरतोय डारडुर, डारडुर. बगू. (गाठोड्याला हात घालतो. ती नाराजीनेच गाठोडे त्याच्याकडे देते. तो ते चाचपून खुषीने) ऐवजच हाय जनू.

**बाई** भारी तरास पल्डा बया. काय धावलो म्या. धक्क्यावरतून मारली उडी म्हून सुटलो. न्हाई तर गावातच हुतो त्या चपट्या नाकाच्या मुड्द्याच्या हातात—गुरखा न्हवं.

**बाप्या** (गाठोड्यातून काढून) ही वस्तू मस्त सोभंल बग तुज्या कंठामंदी. कशी झ्यागमाग करंल. (तिच्या गळ्याशी धरून) राजाची रानीच जनू. न्हाई तर ती सायराबानू.

**बाई** (संकोचत, लाजत, अनुरागाने) किडं पल्डं तोंडात तुज्या, मेल्या. काय बोलतोय मुडदा. आरं असला माल गळ्यामंदी घालूनशान फिरू व्हय ? वा रं वा.

**बाप्या** आगं पर खरं शोभतुया तुज्या कंठामंदी–बग–बग तरी–

**बाई** चल भडव्या. दूर हो. आरं ठ्येव म्हंतोय तर. पघंल न्हवं कोन ?

**बाप्या** (गाठोड्यात ठेवीत डोळा घालून) आमच्याकडं बी काय तरी हाय. (खमीसा आतल्या कुठल्या तरी खिशातून काळजीपूर्वक काढून दाखवीत) बग.

**बाई** (पाहून हरखत) अगो बया. नोटा !

**बाप्या** श्शू–हळू.

**बाई** इतक्या रं कशा घावल्या ? (कौतुकाने) बकरा मस्तच घावला म्हन की कोन—

**बाप्या** भिकारी हुता भिकारी.

**बाई** (हनुवटीला हात) काय ?

**बाप्या** व्हय, बैरागी हुता बंभोले. रस्त्याकडंला पसारला हुता गावठी पिऊन. सुटवाल्याचा खिसा उतरवला तर खाली पाकीट, तपकिरीची डिब्बी न् घाण्यारडा रुमाल हातामंदी लागतोय. पर बैराग्याच्या कमंडलूमंदी–हूं. किती हायती, हाय ठावकी ?

**बाई** (कौतुकाने) किती मुड्द्या ?

बाप्या — पाच रोकडे दोन इसा.

बाई — (कौतुकानेच) खरं मेल्या ?

बाप्या — बग की. (तिच्यापुढे नोटांचे पुडके धरतो. ती बघून हरखलेली.) हाय का नाय आमी बी ? आं ? कमती न्हाई तुमच्यापरीस.

बाई — तरी मला वाटलंच हुतं. मस्त पाह्यले म्या, पर तू तो तुच बग. (खेटून बसते.)

बाप्या — (लटका) दूर हो. बायमान्सानं आंगाला आंग लावल्यालं खपत न्हाई आमाला.

बाई — (आणखी खेटत) आरं जा. मी बी कोन तसली बाई न्हवं. सोता कमिवतोय.

बाप्या — (नाकावर बोट) श्शू. गाप. कोन येतंय जनू.

[ बाई गडबडीनं गाठोडे बाप्याकडून हिसकून ओच्यात लपवते. दोघे कान देतात. पुरुष अर्धवट उठलेला. लांवून भजनाचे आवाज. कुत्र्याची अस्पष्ट भुंक. ]

कोन बी न्हाई, मला वाटलं त्यो आला–त्यो–सबइनिसपेट्टर भोसले. लई वंगाळ मानुस. काय मानुसपन न्हाईंच बग त्येला. निस्ती मिशिच–आकड्यावाली. आल्यापुन बोलत न्हाई, डरकाळतोय गडी सर्कशीतल्या शिंवागत. चोर म्हनलं का अंगात येतंय भडव्याच्या. काय मारतोय. (अजाणता गालफड चोळतो ) हितं बी येत हुता न्हवं त्यो ड्यूटीला. त्या भल्याकाकालाबी दाबजोर तरास द्येयाचा बग. कनिष्टेबल दोनशा आठरा, ह्ये का न्हाई क्येलं ? कनिष्टेबल दोनशा आठरा, त्ये काय न्हाई झालं ? ह्येचं काय झालं ? त्येचं काय क्येलं ? तू नालायक हाईस. तू वुढ्ढा झालास. असा राग यायचा त्येचा...

बाई — तुला बी भारीच म्हाईती दिसतीया हितली.

बाप्या — ह्या. पैलं ह्येच की ठिकान आपलं, कामाचं. नवे नवे बंगले हुते. चार टैम आलो हुतो ह्येच ग्येटावू. दोन टैम कोडतात सुटलो न् दोन टैम जाऊन बी आलो–सासुरवाडीला.

बाई — (कौतुकानेच) पटकी आली तुज्या सासुरवाडीला–काय वाटत बी न्हाई मुड्द्याला. (हलक्या आवाजात) माजा दाल्ला धा वर्सं जेल काढतुया. पाच ग्येली, अजुन पाच हायती.

बाप्या — काय क्येलं ? (बाई हाताच्या हालचालीनं दाखवते गळा कापून खून म्हणून. लांब सरकतो यासरशी एकदम.) चला बा. झोपाय होवं.

बेकार जागरन मानवत न्हाई आमाला. गारठाबी भारीच. फाटंफाटं परतुन निगाय होवं. दिस उजाडला तर सम्दा घोटाळा. चल, झोप तू बी.

बाई पर तो इनिसपेक्टर—

बाप्या आगं त्यो काय खातोय का काय ? (गालफड चोळतो.) आला तर हुईल हुईल म्हंजी मी म्हंतो काय हुईल ? वरडंल जरा पिसाळल्या कुत्र्यावाणी. चला उटा. चौकी म्हंजी काय धरमशाळा वाटली का काय रे साले ओ ? का उगा आपलं झोपमंदीच हात जोडुनशान, माफ करा साह्येब, जातू साह्येब, गरीब हाय साह्येब, करायचं फार झालं, लाथच घालायला लागला तर उठुन जायचं गुमान. आगं ग्येटावर चोर झोपलं आसं कुनाला वाटलं ? आन त्यो भोसल्याबी या पावसात कशापाय हितं येतोय मराय ? पर तोंड लपवुनशान न्हायचं बरं का घोंगड्यामंदी. चोर तोंडावरनं वळखतोय गडी. लई वंगाळ.

बाई माजी सासु म्हनायची, लक्ष्मीवाणी दिसतोय मी म्हून.

बाप्या हा. दिसतियास. आता लक्ष्मीबी चोऱ्या कराय लागली म्हंजी—

बाई गाप् मुड्या. न्हाई तर मुस्काट फोडेन, सांगुन ठेवतोय.

बाप्या नगं. ह्ये आसुन्दी इनसपेक्टर भोसल्यासाठी. तू पड तुजं संबाळुनशान. (झोपायची तयारी करतो. सवयीनेच पुटपुटतो, हरी हरी.) पड तुबी गुमान आता.

(बाई मुरगुशी मारून कट्टयावर आडवळते. घोंगडे पांघरते.)

बाई (मध्येच टोकरी काढून) आईक रं मुड्या. उजाडाय आदुगर उठीव मला. चारसोबीसगिरी करशील तर—

बाप्या (वैतागून) आता पड की गुमान. बाईची जातच वंगाळ. झोपली तरीबी बडबडलं तरीबी. (असे म्हणत तोही आडवळतो. जरा खोकत रहातो उबळीनी. मग निवांत होतो.)

[ किंचितकाळ असेच. शांतता. लांबवरून कुत्र्यांचे भुंकणे, रडणे. मग लांबवरून माणसांची चाहूल. जवळ येऊ लागते. अस्पष्ट शब्द. पोलिसी वहाणांचा करंकरं आवाज. आणखी दोन माणसांची पावले. रंगमंचावर एकूण तीन जण येतात. पुढे साठीच्या वयाचा, छपरी पिकल्या मिशांचा कॉन्स्टेबल भल्याकाका. अंगावर गरम पोलिसी कोट. हा म्हातारे पाय ओढत चालतो. त्याच्यामागून हातकड्या घातलेला काटकुळचा अंगाचा, विस्कटला, चोर. त्याच्यामागून फिर्यादी. शर्ट, पँट,

अंगांत गळ्यापर्यंत स्वेटर, डोक्याभोवती मफलर, नाकाला चष्मा. जातिवंत पांढरपेशा, हे सगळे लटांवर रंगमंचावर येते.]

**भल्या** (भरदार घोगऱ्या आवाजात) हडेरहप्प.

(मागचे दोघे आपसुख थांबतात. काका चौकीत शिरतो. तेवत्या कंदिलाची वात मोठी करतो. चौकीत प्रकाश वाढतो.)

(स्वत:शीच) सगळ्या गावात विलेक्ट्रिशिटी झाली पण या दीड-दमडीच्या गेटावर कंदिल ! तशरीफ रखो, (हे कुणाला ते प्रथम कळत नाही. मग वळून फिर्यादीला) तशरीफ रखो.

(तो न कळून नुसताच उभा.)

शिट डाऊन.

(तो स्टुलावर बसतो.)

अंग्रेजीत बोललं म्हणजे कळतंय सगळ्यान्ला. साहेबाच्या भाषेत. (चोराकडे पाहून) तू खडाच रहा. चोरी करता है. (हे म्हणता म्हणताच फिर्याद नोंदवण्याचे साहित्य काढतो टेबलातून.) पावसात चोरी करतोय. येवढ्या रातची ! नालायक. चोरी करायला हा आडमाप वखतच सापडला तुला ? अबे तुला काही झोपबीप ? (चुटक्या वाजवून जांभई दाबतो. मग खुर्चीत येऊन बसतो. डोळे घसाघसा बोटांनी चोळतो.)

आव इधर.

(चोर तिथे येऊन उभा रहातो.)

(चोराला न्याहाळत) बहुत लगा है. रगतभी आया है. म्हैनत करता है ? जोरजोडी, बैठक, लढंतगढंत ? खुराक ? दूध गलास गलास दोन टैम धारोष्ण ? नुसत्या चोऱ्या कर चोऱ्या. नालायक. मग असा मार खावा लागतो. पहेला शरीर संभलना मंगता है, (फिर्यादीला) या, साहेब. असे इथं बसा. (टेबलापलीकडची जागा दर्शवीत) शिट डाऊन–इथं.

(फिर्यादी नाखुषीने स्टूल भर्रदिशी ओढून टेबलाशी बसतो)

(अक्षर लावून रजिस्टर न्याहाळीत) हडेरहप्प. सात डाग, कुडी, चंद्रहार, अंगठ्या जोड, नथ नग दोन, बांगड्या–सोन्याच्या...चोरी. ही संध्याकाळला नोंद झालेली. काय चोऱ्या चालल्यात. जो उठतोय तो चोऱ्याच करतोय. (फिर्यादीला) व्हॉट नेम ?

**फिर्यादी** विश्वनाथ बाजीराव पेशवे.

**भल्या** (ऐकू न आल्यासारखा) क्या ?

**फिर्यादी** विश्वनाथ बाजीराव पेशवे. ऐकू कमी येतं काय ?

**भल्या** तुमचंच नाव सांगा ?

**फिर्यादी** (तापत) मग कुणाचं सांगतोय. विश्वनाथ पेशवे.

**भल्या** (झोपेत असल्यासारखा पहातो आहे.) नाव तो खबरदार है (जीभ मिशीला लावून लिहून घेतो ते प्रयत्नपूर्वक.) पता ? (एकीकडे कंदील आणखी मोठा करतो.)

**फिर्यादी** नातू बंगला, जेल रोड—

**भल्या** नातू बंगला—(लिहून घेताना थांबून नफरतीने) क्या ? नातू बंगला ? म्हणजे पेशवाई यानंच घालिवली !

**फिर्यादी** ते नातू वेगळे.

**भल्या** असून्द्या. रोजगार ? तुमचा ?

**फिर्यादी** क्लार्क पी. डब्ल्यू. डी.

**भल्या** (थोडा विचार करून लिहून घेत) नायब् दफ्तरदार पी. डब्ल्यू. डी.

**फिर्यादी** नायब् नव्हे, क्लार्क.

**भल्या** ( जांभई दावीत ) हां, तेच.

**फिर्यादी** मग ते नायब् दफ्तर बिफ्तर काय लिहिता ?

**भल्या** ( संयम करीत ) सांगायचं काम तुमचं आहे, लिहून घ्यायचं आमचं आहे. क्लार्क पी. डब्ल्यू. डी. नातू बंगला. हुंः !

**फिर्यादी** डोकं ठिकाणावर आहे ना तुमचं ?

**भल्या** कसं रहाणार ? म्हेनत केल्यय कधी ? बैठक, लढंतगढंत, जोरजोडी, घोडेसवारी ?

**फिर्यादी** त्याचा इथे काय संबंध ? तुम्हाला फिर्याद नोंदवून घ्यायच्यय का नाही ? नॉनसेन्स. चोरी झाल्यय नि इतक्या रात्रीचा घोडेसवारी विचारतोय. काय अंमल केलाय काय ? गारठा केवढा पडलाय. त्यात झोपेचं खोबरं. चोर दुसरा नि मालकाला ताप. पुन्हा सकाळी ऑफिस. हॅः !

**भल्या** ( तसाच, तुच्छतेने ) हॅः.

**फिर्यादी** (उठत तापून) रिपोर्ट करीन वर, सांगून ठेवतोय.

**भल्या** पेशवे बाजीराव. क्लार्क पी. डब्ल्यू. डी. (एकदम मोठा आवंढा गिळून ) र–रिपोर्ट–नका करू, साहेब. कभी कभी होताय. शिट–शिट डाऊन साहेब, शिट डाऊन. (आता मात्र रीतसर सर्व नोंदी घेतो चोरीच्या.)

अब दस्तखत करो. हां, इथंच. जरा दाबून घ्या, टाकं.

(फिर्यादी सही करतो.)

जा आता. आगेका देखा जायेगा.

**फिर्यादी** पुन्हा गेटावर यावं लागेल का काय ? उद्या मला फुल डे ऑफिस आहे—मॉर्निंगला बिलकुल टाईम नाही मिळणार—

**भल्या** जरूरत लागेल तर नातू बंगल्यावर माणूस धाडण्यात येईल, पेशवे सरकार.

**फिर्यादी** (पुन्हा पिसाळत.) चावटपणा नकोय !

**भल्या** चावटपणा ?

**फिर्यादी** मग हे सरकारबिरकार काय आहे ? आं ? हे काय आहे ? हे बघा, मॉर्निंगला विष्र खायला सुद्धा सवंड नसते मला--ऑफिस टाइमनंतर ईव्हिनिंगला पार्टटाइम कामाला जातो मी एका ठिकाणी. नाइटला लौकर झोपतो—

**भल्या** ठीक है, ठीक है.

**फिर्यादी** नाही म्हणजे तुम्ही बोलवाल तेव्हां मला यायला सवड असेलच असं नाही—

(हे बोलत बोलत तो जातो निघून. जाता जाता वाटेत चोराशी येऊन एकदम लांबून वळसा घेऊन जातो.)

**भल्या** (थुंकून उद्वेगाने) थूत्. नाव पेशवे आणिक खर्डे घासतंय पी. डब्ल्यू. डी. त. अबे ये कहांका पेशवे.

(चोर उभ्या उभ्या पेंगतो आहे.)

हडेरहप्प

(चोर खडबडून जागा होतो.)

उभ्या उभ्या झोपतोस ? (त्याला पाणी देतो.) पी. झोप उडेल. (चोर पाणी पितो.)

(ग्लास माठाजवळ ठेवून काका पुन्हा खुर्चीत येऊन बसतो. गळ्याची बटणे सोडतो. डोईवरची टोपी काढून पुढ्यात टाकतो. कमरेचा पट्टा सोडतो आणि त्यासरशी जागच्या जागी दुप्पट झाल्यासारखा वाटतो.)

अब जरा खुल्ला लगा. रखो, तशरीफ रखो इधर.

(चोर येऊन स्टुलावर बसतो. बसल्या बसल्या हुडहुडू लागतो, पेंगू लागतो.)

शिध्धा बैठ जांव.

(चोर तसा बसतो.)

चोर ते चोर आणिक झोप राजाची ! नालायक. झोपू नकोस. (मिशी उगीच वरखाली हलवीत चोराला थोडा वेळा न्याहाळून) कोणच्या गावचा तूं ?

**चोर** (हुडहुडत) द-द-देहूचा—

**भल्या** देहू—(एकदम) देहूचा ? तू देहूचा ? अरे अरे अरे. नालायक ! तुकाराम बावाच्या गावात जल्मलास आणि चोर निपजलास ? बाप काय करत होता तुझा ? रोजगार ?

**चोर** गार भारी वाटतंय. जमीन कसत होता. घरची जमीन होती गावी.

**भल्या** मग ती काय झाली ?

**चोर** आमचा बाप भोळासांब, ल-ल-लुटला भाऊबंदानी. बाप दर वेळेला म्हणायचा, जाऊ दे, त्याचा शेर त्याला मिळाला. होता होता सगळ्यांचे शेर सगळ्यांना मिळाले न् बाप खंक बनला. मला रोजगाराला लावलं पण माझं चित्त त्यात लागेना. (हुडहुडतो आहे.)

**भल्या** थंडी बजती है तो बोलता क्यौ नहीं कंबख्त ? (बाजूच्या अडगळीतून एक घोंगडे आणून चोराच्या अंगावर टाकतो) लेव. बैठ जाव अब शिध्धा.

**चोर** (घोंगडे लपेटून जरा हुशारत) गेली जमीन भाईबंदांकडनं परत मिळवावयची दावे लावून, ही जिद्द होती. पण पैसा नव्हता. रोजगारात भाकरतुकडा सुटे. वाटू लागलं का हयातभर रोजगार केला तरी हातात पैसा रहाणार नाही. जमीन कोडतात जितून घेता येणार नाही. म्हणून चोरी केली. आता बाकी कशी उब आली.

**भल्या** ऊब आली. हत् नालायक. (एकीकडे उठून कथलाच्या ग्लासात पाणी भरून घेत) हिंमतसे काम लेना मंगता. घोड्यासारखे कष्ट करायचे. दमडी दमडी साठवायची. फिकीर नही दस—बीस बरस लगे तो भी. लेकीन नेकीसे जीतना अच्छा था. (दोन गालफडात पाण्याची भली मोठी चूळ आळीपाळीने फिरवून मग ती लांब गेटाबाहेर तोंडा-वाटे उडवून देतो.)

**चोर** आपल्याला तेवढा धीर निघाला नाही ना. त्यात एकेक भाईबंद मरू लागला. मग म्हणालो जास्त थांबलो तर घात होईल, म्हणून चोरी केली. घोंगड्यानं बाकी मजा आली.

**भल्या** किती खेपा जेल काढलास ?

**चोर** चार खेपा हातोहात सुटलो. आता या खेपेचं बघायचं. मुद्देमाल नाही म्हणजे वकील हुशार मिळाला तर जरा आशा आहे. खरं म्हणजे या खेपेला पण लोकांच्या हाती गावलो नसतो तर पुरता सुटलोच होतो. ते लहान पोर वाटेत आलं त्यानं सगळा घोटाळा झाला. ते चुकवण्या-साठी वाट बदलली नि पावसाच्या निसरड्यावरनं घसरून आपटलो.

**भल्या** काय बायको–पोरं ?

**चोर** छट्. जमलंच नाही.

**भल्या** (नाकपुडीवर बोट ठेवून) मग हे ?

**चोर** हां. थोडं थोडं. जरूरीपरमाणे.

**भल्या** हरकत नाही. लेकिन जादा होशियारी से रोग नही लगा लेना. नाहीतर पस्तावशील.

**चोर** तसा सावध असतो.

**भल्या** (जरा प्रशस्त बसून) अच्छा. हमने भी कुछ दुनिया देखी है, दोस्त. कुछ रंग, कुछ मजा. आहे कनिष्टेबल म्हणून जाऊ नकोस. हम भी कुछ थे. (झुबकेदार पांढरी मिशी वर–खाली हलवीत नुसता बसून राहतो. मग स्वत:ला गोळा करून कसाबसा उठत) चल, लाकपमधी बंद करतो तुला. पड तिथं सकाळसर. रात केवढी झाली. उद्या पुन्हा घरात नातवाचं बारसं.

**चोर** तुमच्या ?

**भल्या** तर कुणाच्या, तुझ्या ? नालायक. (लॉकपचे दार उघडीत) मुलाच्या मुलाचं नाही, मुलीच्या मुलाचं. दिवसा झोप नाही गावणार. पुन्हा उद्या रातला ड्युटी. आज पण दिवसा झोप नाही गावलेली. कालचं तेच. डोळ्यान्ला शिशाची झडप बसवलीत जशी. (चोराला आत ठेवून लॉकपला कुलूप घालतो. कडाडून एक जांभई देतो.) पड गुमान आता. (परत येऊन खुर्चीत बसतो. कंदील जरा बारीक करतो.) चलो, सो जाव अब. (स्वत: पंजात गालफड विसावून डोळे झाकून घेतो निवांत.)

(कुठून तरी लष्करी बँडचे सूर ऐकू येऊ लागतात. भल्याकाका धसकून जागा. बँडचे सूर बंद. काका पुन्हा डोळे झाकून पेंगतो आणि बँडचे सूर पुन्हा येऊ लागतात. जवळ येतात. त्याबरोबर

लेझीम, झांजा, मधूनच तुताऱ्या. दसऱ्याची मिरवणूक चालली असल्याचे वातावरण या आवाजांनी येते. यातच मिरवणुकीतल्या लोकांचा ओरडा, ललकाऱ्या. डोळे झाकलेल्या भल्याकाकावर 'स्पॉट' येतो. काकाची कुडी तुस्त होते. मुद्रेवर दरबारी रुबाब येतो. हत्ती झुलल्यासारखा काका बसल्या जागी झुलू लागतो. डोळे मिटलेलेच. मध्येच हे आवाज बंद. काकावरचा स्पॉट गेलेला. क्षणमात्र बसल्या बसल्या झोपलेला काका टांगल्यासारखा होतो आणि दणदिशी आपटावा तसा खडबडून जागा होतो. धसक्याने इकडे तिकडे पहातो. कसलातरी शोध घेतो झोपलेल्या नजरेने. कान देतो. सहा एक वर्षाच्या मुलाचे थांबून थांबून दबले रडणे कोठून तरी ऐकू येते आहे. काकाला किंचित्काळ या आवाजाचा अर्थच कळत नाही. तो बोटांनी भसाभस डोळे चोळून इतस्तत: पहातो. मग डोळे पुन्हा मिटून घेतो, गालफड पंजात विसावून, आवाज येतच राहतो. पोरका, केविलवाणा. काका पुन्हा डोळ मुष्किलीने उघडतो. कंदिलाची वात मोठी करतो. कंदिल उचलतो आणि जागेवरून सगळीकडचा शोध घेतो. आवाज थांबून थांबून चालूच. काका लॉकपमधल्या घोरल्या चोराला न्याहाळतो. कट्टयावरच्या झोपल्या जोडप्याला न्याहाळतो. मग कसाबसा पाय ओढत चौकीबाहेर उतरतो. अगदी कोपऱ्यात, अंधारात, पाच सहा वर्षांचे एक पोर मुळूमुळू रडते आहे. काका कंदिल जवळ धरून त्याला बघतो.)

**भल्या** हुडेरहप्प.

(पोर घाबरून रडण्याचे थांबते.)

कोण तू ?

(इथून पुढे पोर कशालाही उत्तर करीत नाही.)

तुझे आईबाप कुठायत ? इथं कसा आलास ? कुठला तू ? घरबीर काय आहे काय नाही तुला ? बोल की पोरट्या.

(पोर काहीही बोलत नाही.)

(काका वांध्यात. कंदील उंच धरून एकदा भोवतालचा भाग न्याहाळतो. कुठे कोणी दिसत नाही.) कुठनं आला तू ? कुठनं ?

(पोर धाकानेच की काय, एकीकडे बोट दाखवते.)

तिथनं ?

(आता पोर दुसरीकडे बोट दाखवते)

तिथंन ? आं ?

(पोर आणखीच कुठेतरी बोट दाखवते.)

च्यायला पोर आहे का भूत ? नक्की कुठनं आलास बोल.

(पोर गांगरलेले. काका आता त्याची बकोट धरून त्याला उचलतो आणि गेटामध्ये आणतो. एका हातातला कंदिल जागच्या जागी ठेवतो. आणि पोराला समोर धरतो.)

बोल आता. नाव, बापाचं नाव, पता.

(पोर गप्प उभे)

हडेलहप्प. बच्चे, बोलता येतं का नाही तुला ? छया ! आजची रातच खराब.

(पोर मख्ख उभे.)

(काका उठून पाणी पितो घटाघटा. मोठा ढेकर देतो. खिशातून तमाखूची डबी काढून तोबरा भरतो. जागच्या जागी थोडी कवायत करतो. मग नव्याने त्या पोराला, न्याहाळू लागतो. ते तसेच उभे. अखेर काका नाइलाजाने) झोप. सो जाव अब, रामपारकूच देखेंगे. (पाय ओढत खुर्चीत जाऊत बसतो. पुन्हा मुष्किलीने उठून कोपऱ्यात जाऊन एक चिरगूट आणून ते एकीकडं अंथरतो.) सो जाव ताबडतोब. झोपेचं खोबरं तिच्या मायला. तरास खाली पिलो. सो जाव बच्चे.

(ते उभे)

क्या बोलते है हम ? सुनते नही ?

(ते घाबरून उभे.)

पोरटं भैरं मुकं तर नाही ?

(काका त्याला बळेच आडवे करतो. त्याच्या अंगावर आपला गरम पोलिसी कोट पांघरतो.) ऐसा.

(ते उठून बसते.)

(काकाला संतापाची उबळ येते. पण तो ती दाबतो. पोराला घाईने पुन्हा आडवे करून थापटतो. त्याच्यावर कोट पांघरतो. खुर्चीत येऊन बसतो तर पोर उठून बसलेले. काकाच्या झुबकेदार मिशा वैतागाने वर-खाली होऊ लागतात. गळ्यावाटे संतापाची घोगरी गुरगुर उमटू लागते.) बच्चे, ताकदका खेल देखना मंगता है क्या ? सूर्याची पिल्लं पहायचीत, सूर्याची पिल्लं ? ऊं ? (इकडे तिकडे बघतो. कष्टाने उठून

खुंटीचे दांडके उचलतो. पोराकडे पहातो, दांडके ठेवून देतो. डोके थापटतो ) लेकिन हुआ है क्या ? भूक लागली भूक ?

(त्यासरशी पोर जोरजोराने होकारार्थी मान हलवते.)

तो पहेले क्यू नहीं बोलता कंबख्त ? (बाजूच्या लाकडी घडवंची-वरच्या पिवळ्या कागदांच्या थप्प्यांवरचा आपला खाण्याचा डबा उचलून तो आणून उघडून पोरापुढे ठेवतो. ) खा. पण झोप एकदा. रातच्या पारी मोफतची बला एकेक...

(पोर भसा भसा खाऊन पुन्हा बसून राहिलेले.)

अब क्या हुआ ? सो जाव. झोपबीप काय आहे का नाही तुला, हैवान ? सकाळला पोचवू तुला घरी, काढू तुझ्या बापाचा पता, फिरू गावभर. तंगड्यातोडा. पब्लिक का सर्वंट है ना. पता नाही गावला तर फटके मिळतील बघ चड्डीवर. घरसे भगना मंगता है, आ ? आईबापका ऐकना अच्छा नहीं लगता है क्या ? अकल बढी है शायद ! सबके सब दात उतार देंगे एक थप्पड में. (जांभई येतेच.) सो जाव अब. चलो. सो जाव, नाहीतर रहा खुशाल जागा. आपला तर सुपडा साफ झाला... (खुर्चीत येऊन बसलेला, पोर आडवे झालेले.) दोन तरी वाजले असतील. आता दोन घंट्यात पहाट फटफटेल. पुन्हा दिवसा बारसं नातवाचं. उद्या रात्रीला पुन्हा ड्यूटी. परवा रात्रीपत्तर झोप नाही गावणार. दोन दिवस झाले, डोळ्याला डोळा नाही. (एकदम आठवण होऊन मिशा माफक पिंजारत) ती पेशव्याची अवलाद, पाप्याचं पितर.. खर्डे घासतंय पीडब्ल्यूडीत. नातूचा बंगला थूत. (पंजात गालफड विसावतो. डोळे मिटतो. पुन्हा डोळे उघडून कंदील बारीक करतो. डोळे मिटतो. मग मुष्किलीने पुन्हा डोळे उघडून आडव्या पोराकडे एकदा जाऊन वाकून बघतो. परत खुर्चीत येऊन बसतो. कंदील जरा मोठाच करतो. मग डोळं झाकून बसल्या बसल्या, झोपेच्या आधीन होऊन लागतो.

ड्रमचा ताल सुरू होतो. काकावर स्पॉट उजळतो. काका बसल्या जागी ताठ होतो. छाती फुगते. जणू चालत सैन्याचे इन्सपेक्शन करतो आहे. हाताने कुणाचे तरी काल्पनिक बकल नीट करतो. रायफल सिधी करतो. आणि मध्येच एकदम भयंकर मैदानी आवाजात ओरडतो,) हडेरहप्प.

(काकावरचा स्पॉट गेलेला. झोपलेले पोर मनस्वी घाबरून उठून बसलेले. लॉकपमधला आडवळला, झोपला चोर धसकून जागा झालेला.

कट्ट्यावरच्या जोडप्यातली बाई ताड्दिशी उठून बसलेली.)

**बाई** (गयावया करीत) मी नाही इनसपेक्टरसाहेब.

**बाप्या** (पडल्या पडल्याच तिला ओढून दडपीत) आग गाप. सप्नात हाय त्यो. झोप गुमान...

(दोघे निपचित.)

**चोर** (लॉकपमधून) हवालदार, जागे व्हा हवालदार. काय झालं हवालदार ? केवढ्यांदा ओरडलात. ह्या. पार उडाली झोप. आता कुठं लागत होती.

**भल्या** (अर्धवट जागा झालेला) क्या है ? कोण आहे ते ? बरखास्त. कवायत बरखास्त. (समोरच्या बसल्या मुलाकडे लक्ष जाते. त्याच्याकडे पहात) कोण आपण ? धाकटे सरकार ? (उठून मुजरा करण्यासाठी वाकतो. तसाच पहात) का तू बगू आतेचा तात्याराया ? (संपूर्ण जागा होत डोके झाडीत) छ्या. काही निभेना. किती वाजले ?

**चोर** (लॉकपमधून) मस्त दोन तरी वाजले असतील. रात गेलीच म्हणा की.

**भल्या** कोण आहे तिकडे ?

**चोर** मी—चोर. लाकपमधनं बोलतोय.

**भल्या** लाकप—(लक्षात येऊन खुर्चीत बसत) झोप. रात फार झाली. (पंजात गालफड विसावलेले, समोरच्या मुलाला) झोप. भटजीनं सांगितलंय का रात्र थोडी आहे म्हणून...

**चोर** आता कसली झोप. केवढ्यांदा ओरडलात.

**भल्या** कोण ओरडला ?

**चोर** तुम्ही. अजून घाम निघतोय अंगातनं. कापरं पण जात नाही.

**भल्या** काय ओरडलो ?

**चोर** काय की. पण आवाज मोठा झाला. आता कसली झोप येते ? जागरण रात्रभर.

**भल्या** (जांभई भरून) मला भूक लागलीय पोटात. मुलीचा न् जावयाचा उपास गुरवारचा. मग आम्हाला पण एकादशी. हाटेलात एक प्लेट मिसळ खाल्ली ती समुद्रात पंचपात्रीभर आचमन झाली. डब्यात दोन पोळया होत्या काल रात्रीच्या, त्या या पोरानं हजम केल्या. पोटात चावू लागलंय. चला, झोपा. (झोपण्याचा प्रयत्न करू लागतो.)

**चोर** विडी असली तर एक टाका की हवालदार. तेवढाच टैम कटेल.

**भल्या** नाही बाबा तमाखू आहे तमाखू.

**चोर** द्या. काही तरी तोंडात असलं म्हणजे झालं. तमाखू द्या. द्या की.

**भल्या** (कुरकुरत) क्या बे इतनी रातकू (खिशातून डबी काढतो) थोडीच राहिली बघ.

**चोर** चालेल मला.

**भल्या** (नाइलाजाने उठत) मायची सर्व्हिस ही...मोफतचा तरास म्हातारपणी...(जाऊन लॉकपमधल्या चोराकडे डबी देतो. मागे पोर बसलेलेच.) तू का उठून बसलास परतून ? सो जाव. (ते बसलेलेच.) बच्चे, सो जाव, बोलता है ना हम. (ते बसलेलेच.) सुनता नही ? सो जाव ! (संशयाने) का परतून भूक लागली ? (ते तसेच. काका आता वैतागतो.) आमच्या फर्मानाची उमेट पायमल्ली ? कौन है इधर, है मालूम ? ऊं ? रिटायर शिबंदी कामगार याने कमांडर इन चीफ स्टेट ऑफ बुंदवाड. जानता है कमांडर कौन होता है. सेनापती– सेनापती थे हम. दीडशाची खडी पलटण होती अखत्यारीत. पंचेवीस घोडेसवारांचा रिसाला आणि दोन तोफांचा तोफखाना होता. वाड्यावर हत्तीवरून सवारी जायची आमची. दसऱ्याच्या प्रोशिसनमध्ये पुढून तिसरा हत्ती आमचा असायचा. पहिला सरकारस्वारीचा. दुसरा दिवाणाचा आणि तिसरा आमचा. स्टेटमध्ये चौथा हत्ती नव्हता. पोटात तरास होतो. भूक आवरत नाही. झोप दाबजोर येते. पण भुकेचा तरास. बच्चे, हम बोलते है, सो जाव.

(पोर क्रमाने आडवे.)

**चोर** (लॉकपमधून तमाखू घोटून) हा. आता जरा बरं वाटतंय.

**भल्या** बरं वाटतंय. काय बरं वाटतंय ? होतो कोण, झालो कोण...जमाना पलट गया. बडा घोटाळा झालाय...

**चोर** नाटकाबिटकात पार्ट करण्याची आवड आहे वाटतं तुम्हाला !

**भल्या** नाटक थूत. तोंडाला रंग फासून नाचायचं लोकांसमोर ?

**चोर** मग आता ते सैन्याबिन्यातलं भाषण म्हटलंत ते—

**भल्या** नालायक, हम हमारे दिलसे बोलता था. सगळं खरं होतं ते. तेच खरं होतं. बस्सं. बाकी सब झूटा मामला.

(चोर हसतो.)

हसलास का ? बोल ?

**चोर** कुठं. उगीच.

भल्या बस्स कर हसणं नाहीतर गळा घोटीन. सगळ्यांलाच मजाक वाटते मजाक. फिरभी सच था वो जमाना. ष्टेट खालसा झालं नि खेळ खतम झाला सगळा. भूक आवरत नाही.–बच्चे सो जाव, कहता है ना हम.

(पोर घाबरून आडवे होते.)

आस्सं ...चोर...

चोर (गजांशी येऊन) मला हाक घातलीत !

भल्या हो. तुलाच. तमाखू लाव इधर.

चोर तमाखू संपली. थोडीच तर होती.

भल्या थोडीच होती. बघू–डबी वापस बघू इकडे.

चोर गजांशी या. घ्या.

(काका कसाबसा उठून लॉकपकडे जाऊन डबी घेतो. उघडून उलट सुलट करून पहातो.)

भल्या खतम तमाखू. (उसासून) ती पण नाही. (डबीचा वास घेत फिरतो.) पोळ्यांचा डबा रिकामा, तमाखू खतम. रात शिंची अजून सरायची आहे. बहुत लम्बी असते अलीकडे रात, हडेरहप्प. तल्लफ तर आलीय (पुन्हा पुन्हा डबी उलटसुलट करतो, वास घेतो.) चोर, काय तरी बोल हरामजादं. रात तर कटली पाहिजे.

चोर थोबाड सगळं आग लागल्यागत जळतंय. भारी मार बसला.

भल्या कर, चोरी कर चोरी. (पुन्हा प्रयासांनी उठून कोपऱ्यातली फर्स्ट एडची पेटी काढतो. धूळ झटकून ती गजांशी नेऊन आत ढकलतो.) लाव यात काय असंल ते. बघ काय आहे शिल्लक. पण चोरीची आदत वाईट. ष्टेट ऑफ बुंदवाडमध्ये चोरीच्या गुन्ह्याला फटक्यांची सजा होती. चोरी म्हणून कुटं होत नव्हती. सगळे चोर रहायचे ष्टेटमध्ये पण चोऱ्या अंग्रेजी हद्दीत करायचे. शेवटच्याचा आधला दिवाण—गोविंदराव सुदर्शने—नंबरी आदमी. पदरी चार चोर बाळगून होता. दिवसा हुजरे, फरास, कामाठी, कोटणीस. रात पडली की चोर–पण ष्टेट हद्दीत नव्हेत, अंग्रेजी हद्दीत. ष्टेटमध्ये सब आल बेल. ऐसा था. हां. एक टैम एक डाका पडला होता. पण तो दर्शन्याच्या चोरांच्या नजरचुकीने. रातचे टेर प्यायले लेकाचे आणि अंग्रेजी मुलूक म्हणून ष्टेट हद्दीवरच्या गावात दंगा केल्यानी. दुसरे दिन पकड के लाया हमने सबकू. घरी येऊन रदबदली करून सोडवले होते दर्शन्याने. दिवाण दर्शन्याने ! ऐसी थी हमारी शान. खैर, गया सो गया. थोडीसी तमाखू मंगती थी.

(तलफेने तळमळतो.) जवळपास दुकान पण कुठं नाही. वखत हा आडमाप.

**चोर** म्हणजे खरंच संस्थानमध्ये होतात तर तुम्ही ?

**भल्या** हडेरहप्प. शक् वाटतो तुला, नालायक ? शिबंदी कामगार याने कमांडर इन चीफ, लँड आर्मी बुंदवाड स्टेट, दख्खन. तुमने उस वख्त देखा नही, प्यारे. आता रया उतरली. पोट सुटलं, पोटऱ्या पोकळ झाल्या. काही राहिलं नाही. पण कसा दिसतं होतो तेव्हा, आहे मालूम ? अबे सुभाष बोसची तसबीर पाहिलीस तू, तोफके बराबर ? तसा दिसत होतो, चष्मा कम और मूंछे ज्यादा. बस. रुबाब कडक. स्टेटमध्ये आम्हाला बघायला येत असत पाहुणे मंडळी. हां. स्टेटमध्ये चौदा साली हुजुर डेपुटी म्हणून लार्क साहेब आला होता. तेव्हा लेडी साहेबांनी मुद्दाम माणूस पाठवून बंगल्यावर बोलवून ओळख करून घेतली होती आमची. मड्डम बिलकूल फिदा होती आमच्यावर. (उसासून मिशीवर ताव देत) चान्स घेता आला असता, पण म्हणलो अंग्रेज–मग ती लेडी का असेना–शत्रुपक्ष. संबंध नको. ऐसा था.

**चोर** पण मग इथे कसे आलात ? पोलिसात ? म्हणजे खरंच वाटत नाही बघा.

**भल्या** हां. आपल्याला पण वाटत नाही, स्वप्न·वाटतं, भ्रम वाटतो भ्रम सगळा. पण खरं आहे. स्टेट खालसा झालं. इंडिया गव्हरमेंटचं फर्मान आलं. पेन्शन हवं तर कमसे कम तीन वर्षं आमच्या अंडर सर्व्हिस करा. आणि पोलिसात कनिष्टेबल केलं (खुर्चीत विकलांग बसलेला.) होता कमांडर इन चीफ, त्याचा झाला पोलिस कनिष्टेबल, हडेरहप्प. हमारा तो दम निकल गया. वय झालं साठीचं. आंग म्हणतं, बस्स झालं, प्यारे. आता घरी चल. लेट बैठकीवर आणि आराम कर. तबियतसे रहो. दोन वखत भरपेट खा आणि डोळे झाकून आठवणी कर एकेक. पण नशीब झक् मारतं. एक बरस तर जाईल कसं ना कसं. मग अजून दोन वर्षं. (केविलवाणा बसतो. डबी पाहून) आणि तुमाखू पण संपली.

**चोर** फार वाईट झालं, सेनापतीसाहेब. माझं तरी काय, होतो चार चौघांसारखा आणि एकदम चोर झालो. खरं पण नाही वाटत. आज खरं म्हणजे मी चोर नसतो तर तुम्हाला सांगतो, मी पण हाणले असते चार लाफे चोराच्या तोंडात. थुंकलो असतो त्याच्यावर. शिव्या घातल्या असत्या आणि पाडले असते त्याचे चार दात. पण व्हायचं नव्हतं. योग नव्हता, दुसरं काय ? योगायोगाच्या गोष्टी आहेत या. पण मला

विचाराल तर चोरीची आदत एकदम हलकट. वाईट. आई शप्पत सांगतोय हे, हवालदारसाहेब. का सेनापतीसाहेब म्हणू आता तुम्हाला ?

**भल्या** म्हणून काय होतंय आता ? म्हण भल्याकाकाच. तेवढंच उरलंय. हा–हा पोरटा–(आडव्या मुलाला दर्शवून) हा जसा आहे तसा मी उरलोय. नाव नाही, गाव नाही. आई बाप नाही. कोण नाही. हुद्दा गया सो सब गया. सगळे परके झाले. पोटची पोर जावयाला फितुर झाली आणि जावई शिरजोर झाला. पोरीची आई तर गेली केव्हाच गुजरून बाळंतरोगानं, तिच्या आधीची गेली तशीच. पोरगा झाला. झाला असता असाच. ये बच्चेके माफिक. अंगानं जरा आडवा; आमचीच औलाद. सहाच महिन्यांत एक दिवशी तो पण गेला अचानक गुदरून. आचके दिले, डाकदर येतो तो कारोभार खतम. आता आपली राह्यली फकस्त याद...गुजरल्या जमान्याची...(डबी हुंगत) आणि तमाखू...मिळाली तर. (भुकेजल्या श्वापदासारखा फिरतो जागच्या जागी.) चोर, प्यारे हे छप्पर फाटून यातून तमाखू पडेल तर काय बहार होईल !

**चोर** मग मी पुन्हा साव होईन आणखी सगळे साव चोर होतील. आणखी– आणखी तुम्ही सेनापती. चष्मा कम और मुच्छे ज्यादा. बरोबर ना ?

**भल्या** पण होणार नाही असं. आता छप्पर फाटेल तर डोक्यात पडण्यासाठी. तमाखू देण्यासाठी नाही. (तमाखूसाठी तळमळत) साधारण कितने बजे होगे चोर !

**चोर** अडचाचा टैम झालाच असेल. पण मला तुम्ही चोर म्हणू नका. त्रास होतो. तसे आपण काही चार चौघांसारखे चोर नव्हे. बापाची जमीन ताब्यात आली का चोरीचा धंदा सोडलाच आपण. नुसता कोडतात निकाल ऐकू द्या.

**भल्या** (तलफेने) थोडी तमाखू हवी होती....

**चोर** मी म्हणतो. ते तिकडे कट्ट्यावर कोण झोपलेत त्यांना का उठवून विचारत नाही ? असली तर देतील.

**भल्या** झोपलेत नव्हे ते. कुणाची झोप मोडणं खराब. आपली झोपमोड झाली तर मगज तापून उठतो आपला. खून चढतो. आणि रोज झोपमोड होते. हरवख्त होते. पण तू म्हणतोस तसंच करू या. चिमूटभर तमाखू असली तर देऊन झोपतील परतून. तल्लफ तो बडी आयी है.

(कट्ट्यावरच्या जोडप्याला उठवण्यासाठी तिकडे म्हाताऱ्या चालीने जातो. तेवढ्यात रस्त्याकडच्या अंधारातून एक खेडवळ आणि बऱ्या रूपाची बाई धापा टाकीत गेटापुढे येते)

**बाई २** हवालदारसाहेब, हवालदारसाहेब दया करा. मला बचवा. मला लपवा. मेला मारंल मला. खून करील माझा. वाचवा मला.

**भल्या** (सहनशीलपणे तिच्याकडे पहात) तू कोण बे आली आणखी ?

**बाई २** ते सांगतो पर मला वाचवा. पाठलाग करतोय त्यो माझा—

**भल्या** पण कोण ?

**बाई २** त्यो-माझा दाल्ला—

**भल्या** मग दाल्ल्यानं पाठलाग करायचा नाही तर कुणी करायचा.

**बाई २** दाल्ला कसला. कसाब हाय त्यो.

**भल्या** तरी पण दाल्ला आहे. जा, वापस जा—

**बाई २** ( एकदम त्याचे पाय पकडून ) न्हाई. हे पाय मी सोडणार नाही. हवालदारसाहेब त्यो माझा लग्नाचा दाल्ला न्हवं—

**भल्या** बाई, पाय सोड आधी. मुडपेल. बिनलग्नाचा दाल्ला कसा होतो बाई ?

**बाई २** आम्ही एकत्र ऱ्हात हुतो. पर कालपास्नं त्यो माझ्या जिवावर उठलाय—

**भल्या** जिवावर उठलाय. लग्नात गुतवला नाहीस त्याला टायमावर, त्याचं प्रायश्चित भोग आता.

**बाई २** मी धरला हट्ट पर त्यानं क्येलं न्हाई लगीन. भुलथापा दिल्या. हवं ते मिळिवलं. वरीस काडलं. आता म्हन्तो, जा. न्हाईतर ठार माराय उठतो.

**भल्या** मग लोकांना का तरास ? तू ऊठ त्याला ठार मारायला. खासगी बाबत आहे तुमची, मध्यानरातची गोंधळ घालीत येतेस, शरम नाही वाटत ? जाव, रामपारकू आव.

**बाई २** न्हाई, मी न्हाई जानार हितनं. मला भ्या वाटती.

**भल्या** हडेरहप्प. उलटून जबाब केलेला खपत नसतो आम्हाला. जाव, रामपारकू आव. तब देखेगा.

**बाई २** येकली परत जाऊ मी ? वाटंत चिट्पाखरूबी न्हाई.

**भल्या** आलीस कशी ?

**बाई २** पळत.

**भल्या** तशी पळत वापस जा. वाटेत कुणी छेडछाड केलीच तर दाल्ल्याचं नाव सांग. सांग, तो तुला ठार मारायला उठलाय. मग कुणाची माय नाही व्यायली तुझ्या नादी लागायला. जाव.

**बाई २** न्हाई, हवालदारसाहेब. रातभर मला हितं न्हाऊ द्या. न्हाइं तर मी काय जितो न्हात न्हाई.

**भल्या** (अत्यंत संयमपूर्वक) बाई, थोडी तमाखू आहे तुझ्याकडे ?

**बाई २** न्हाई. माज्याकडे कुठनं असणार तमाखू ?

**भल्या** तो चलेजाव. (ती कापत उभी) नाहीतर जा आत. बस तिकडं. पण मुस्कट बंद ! ज्यादा आवाज नाही पाहिजे यानंतर.

(ती गेटाच्या आत सरकते. पलीकडे झोपलेल्या मुलाकडे पहाते. लांब बसते.)

म्हणे नवरा मारतो...काय रात आहे आजची का थट्टा.

(तेवढ्यात कट्ट्यावरच्या जोडप्यातला बाप्या जागा झालेला. तो खोकू लागतो.)

कोण आहे तिकडे ? तमाखू असली तर टाका थोडी. नालायक. गेटच्या कट्ट्यावर येऊन झोपतात.

**बाप्या** (उठून घोंगड्यातच लपून, खोकत, तमाखूची चिमूट काढून पुढे धरीत) घ्या साहेब. यवढीच हाय.

(काका जाऊन तमाखू घेतो आणि तोंडात टाकतो. तमाखूची पीक पोटात पोचताच तृप्त होतो.)

**भल्या** आः. गार वाटलं पार. (जोडप्यातला बाप्या कट्ट्यावर पुन्हा आडवळलेला. त्याला) झोप गुमान बाबा. (गेटमध्ये येतो.) अब कटेगी रात. कैसी ना कैसी तिच्या मायला. (पलीकडे बसलेल्या बाईला) नाव काय बया तुझं ?

**बाई २** गोजाक्का...

**भल्या** कुठली तू गोजाक्का ?

**बाई २** (घुटमळून) कराडजवळची. ताकावण्याची.

**भल्या** ताकावण्याची ? शाबास. खासगीतला दप्तरदार बाळकोबा इंगळे ताकावण्याचाच होता.

**बाई २** कोन ?

**भल्या** उभ्या स्टेटमध्ये बाळकोबा चोख माणूस. जामदारखाना त्याच्या

ताब्यात होता. यजमानसाहेबांमागे दादासाहेब आणि बाळासाहेब यांच्यामध्ये तंटा माजला होता तेव्हा दोघांनीही इंगळ्याला आपल्या पुढ्यात घेण्याचा जोरदार धाट घातला होता. पण इंगळे तयार गडी. त्याने जामदारखान्याला मोहोर करून कलेक्टरला जाऊन वर्दी दिली की साहेबहुजुर, मामला बाका आहे. ताबडतोब तुमची माणसं पाठवा आणि मला मोकळा करा. म्हणून जामदारखाना वाचला. दादासाहेबांचा बेत फसला. पुढे थोरल्या आईसाहेबच जातीने येऊन पोचल्या. पण तसा वखत पुन्हा कधीच आला नाही. दरअसल शिबंदी हुश्शार ठेवण्याची आर्डर आली होती हुजुर पोलिटीकल सेक्रेटरीकडून. अन्नदात्यांविरुद्ध हत्यार उठवावं लागतं का काय म्हणून काळजीने टायमाला पाच पोळया कमती झाल्या एकदम, मागला भात जाईनासा झाला दोन दिवस. नाही म्हणायला झोप मात्र लागत असे; ती ईश्वरी कृपा आपल्यावर भरपूर. पण संस्थानची सद्दी बळकट, येरवी तेव्हाच गोरा कारभारी उरावर येऊन बसला असता.

**बाई २** उपकार झाले तुमचे काका. न्हाई तर उद्याचा दीस पहात न्हवती मी.

**भल्या** उपकार कुलस्वामिनीचे म्हणून आमची चाकरी तेव्हा कायम राह्यली, नाहीतर तेव्हाच दांडा गुल होणार होता. (भान येऊन) काय म्हणाली तू ! काय पोरबाळ तुला ?

**बाई २** (बाजूला पलीकडे झोपलेल्या पोराकडे पाहून) न्हाई. पोर न्हाई म्हून तर दाल्ल्याचा राग. लगीन बी करंना न् पोर हवं हुतं त्येला.

**चोर** (लॉकपमधून) आणि ज्याना नको त्याना ही अशी पोरं होतात. बघा कसं गोड पोर आहे ते. म्हणजे मी मोकळा असतो ना—नाही, पण सांगतो—मी मोकळा असतो तर घेऊन गेलो असतो याला.

**भल्या** चोर, दत्तक पोर कधी भावत नाही.

**चोर** छोटू म्हणा, छोटू माझं नाव.

**भल्या** चोर अस नाहीतर छोटू अस, पण ध्यानात ठेव, पोर हवं आपलं स्वताचं; नाहीतर दत्तक होतो पुढे वैरी—

**बाई २** बिनलग्नाच्या दाल्ल्यावाणी.

**भल्या** तू चूप बैठ बाई ! मध्ये मध्ये तोंड खुपसू नकोस. दत्तकाचं बडं प्रकर्ण झालं होतं बुंदवाडात पस्तिसात. (अनावर जांभई येते.) चला झोपा आता. रात थोडी राहली. घंट्यात कोंबडा आरवेल. बाकी तो तरी राह्यला कुठे आता. आता आली ती गजराची कलाकं आणि दूधवाला.

**चोर** दुधाचा धंदा करण्याचा विचार होता मागं माझा.

**भल्या** हडेरहप्प, बेश केलंस केला नाहीस तो. कोऱ्या पहाटेला झोपमोड करण्याचा धंदा. ऐसा संताप येतो हरामखोराचा—पहाटकू तीन तीन बजे कंबख्त दरवाजा खडखडाता है. कोण उठत नाही घरात. जागे असतात पण मजाक बघतात म्हाताऱ्याची. मग अंधारात धडपडत उठायचं. पाय मुडपतात मधीच, दगा देतात. पडायला होतं. अशी भिंत पकडायची. सरकू लागायचं. तो हरामी तिकडे दार वाजवतच असतो. मग अंधारात भांडं सापडत नाही. रोज त्याची जागा निराळी. सापडतं तर मध्येच हातनं निसटतं अचानक. अबे हात गारठलेले असतात ना ! मग बडा आवाज. भांड्याचा इकडे, त्याचा तिकडे. भांडं उचलायचं. वाकताना मौत ओढवते हडेरहप्प. कंबर पुरती खलास असते. भांडं उचलायचं, दार खोलायचं, ती कडी—हडेरहप्प—त्यापेक्षा मौत बरी, सचमुच. मग दूध घ्यायचं हरामखोराकडनं. दूध घालताना शीट वाजवतो चारसोबीस ! आपली ही हालत आणि हा शीट वाजवतो ! वाटतं का त्याच्याच चरवीचा तोबरा भरावा त्याच्या तोंडात. पण झोप आवरत नसते. तसंच दार लावायचं, कडी सरकवायची, भांडं कसं तरी न लवंडता नेऊन ठेवायचं झाकून आणि—हडेरहप्प—एकदाचं अंथरूण गाठायचं. (खुर्चीत विसावलेला.) आण-खिन पुन्हा रामपारचा कार्टीचा रोज ठणठणाट, दूधवाल्यानं दूध कमी घातलं, तुमचं लक्ष कुठं असतं बाबा.

(चोर हसत सुटतो. बाई २ तोंडाला पदर लावते—)

हसायला काय झालं बे. शूट करीन सांगून ठेवतोय.

**बाई २** मी न्हाई हसली. गारठा येतोय न्हवं.

**चोर** काका, पोलिसात जाण्याऐवजी सिनेमात जायला हवं होतं तुम्ही बघा. मस्त नाव कमावलं असतंत. देवाशपथ.

**भल्या** सिनेमा ? थूत. सिनेमा पाह्यलाय एकदाच आपण. पुन्हा नाही पाह्यला. सगळा झूटा मामला. त्यापेक्षा नाटक अच्छा, हां. ष्टेटमध्ये आली होती एक बार एक नाटक कंपनी. पहिला खेळ पॅलेसवर झाला होता. अशी सरकार स्वारी, शेजारी राणी सरकार, तिकडे पलीकडे सगेवाले, अली-कडे खास मर्जीतल्या असामी, झालंच तर दिवाण. आणि असे आपण सरकार-स्वारीच्या मागंच. आणि हॅमलेट, मानापमान का सौभद्र का काय ते झालं होतं, आपल्याला सगळी सारखीच. त्यात तो स्त्रीपार्टी पोर होता. गंगाराम नाम था उसका. दासीचा पार्ट करायचा पण असा

मारू दिसायचा प्यारे. ओहोहो. अस्सल औरतके थोतरीमें मारता थां, हां ! सरकारसवारी निहायत पागल झाली त्याच्यावर. अपना तो पूछो मत. चलो, सोजाव सब. हम भी सो जाते है. रात सरत आली. उद्या पुन्हा बारसं......चलो. (खुर्चीत बसल्या बसल्या गालफड पंजात टेकून झोपेची तयारी करतो. बाई भिंतीला टेकून डोळे मिटते. चोर लॉकपमध्ये बसल्या बसल्या पसरतो.

कट्ट्यावरच्या माणसाला पडल्या पडल्याच खोकल्याची उबळ येते.

खुर्चीतल्या काकावर स्पॉट उजळतो. नाटकातला ऑर्गन वाजू लागतो. तबल्याचा ठेका धरला जातो. काका झाकल्या डोळ्यांनी ते झाडण्याचे दुबळे प्रयत्न करतो. पण आवाज येतच राहतात. रंगमंचावर धूप दरवळत येतो. काकाच्या कुडीत तुस्तपणा येतो. रुबाब येतो. मिटल्या डोळ्यांनीच तो माना डोलावतो. चुकीच्या जागी सम देतो.

ऑर्गनवर लांब लांब ताना चालू होतात.

काका झोपेत पागल. आणि अचानक हे आवाज मध्येच तुटतात. काकावरचा स्पॉट विझतो. गेटच्या दारात सब-इन्सपेक्टर भोसले.)

**भोसले** (आत घुसून गडगडाट करीत) दोनशे अठरा, पुन्हा चौकीत झोपलास ! ऊठ, खडा रहा पहिले. सीधा खडा रहा. अटेन्शन. चौकीत झोपा ताणण्याबद्दल दोन वार्निंगा दिल्या तुला मी, तरी तुझी थेरडी आदत काही जात नाही.

(काका कसाबसा झोपाळलाच उठून उभा राहिलेला सलाम करून.)

चौकी म्हणजे धरमशाला आहे का वेटिंग रूम रेल्वेची ? का भिकारडं सौंस्थान झोपा ताणायला ? सीधा खडा रहा. बकल कुठं आहे ? टोपी कुठं गेली ? पट्ट्या नीट बांधलेल्या नाहीत. वहाणा उलट्या घातल्यास.

(काका हे सर्व सुधारण्यासाठी केविलवाणी खटपट करतो.)

अटेन्शन. पुन्हा झोपलेला सापडलास तर सस्पेण्ड व्हावं लागेल थेरड्या, सांगून ठेवतोय तुला. बुढ्ढा घोडा म्हणून गय करतोय, तर तुझं पुन्हा तेच. पोलिस फोर्स आहे हा, सौंस्थानचे दिवस विसरा. इथं सेनापती

नाहीस तू म्हातारड्या, कॉन्स्टेबल आहेस कॉन्स्टेबल. नीट खडा हो– मान ताठ, छाती पुढे, पोट आत. पोट आत, फोपश्या. ऐकू नाही येत !

(पोट आत घेण्याच्या प्रयत्नात काकाचे हाल.)–

पोट आत–अच्छा, तूर्त राहू दे पोट बाहेर, पण उद्या आत, सांगून ठेवतोय. काय ही गेटची हालत. हा डबा कुणाचा ? तुझा. इथं खायला सर्व्हिस देतं काय सरकार तुम्हाला ? आणि ही डबी तमाखूची. हेच कर इथं बसून. आणि ही बाई कोण ? हे पण चालवलंयस इथं !

**बाई २** न्हाई साह्यब–तसं न्हवं–माजा दाल्ला खून करणार हुता माजा—

**भोसले** मग ? काय वाईट झालं ? जून दिसतेस, तरुणपण सरलं का बाईनं जगता कामा नये. मोफतची बैदा...हे कार्ट कुठलं ?

(ते पोर एव्हाना घाबरून उठून बसलेले.)

कुठलं हे दोनशे अठरा ? तुझं तर नव्हे ? उठ रे. काय आहे तुझं ?

**चोर** (लॉकपमधून) चुकलं होतं वाटतं. रस्त्यावर रडत बसलं होतं—

**भोसले** चूप. (लॉकपकडे जाऊन मिशी पिळीत चोराला न्याहाळीत) जबडा निखळवला पायजेल तुझा. (मुलाला) काय रे पोरट्या, बाप कुठाय तुझा ? आई धंदा करत असेल. यांचा धंदा नि पोरं पोलिस डिपार्टमेंटनं संभाळायची. दोनशे अठरा, इथं कबिला जमवत होतास का काय ? बिऱ्हाड थाटायचा विचार होता ? (बाईला) ऊठ ग ए, तशी तिथं भिंतीशी उभी रहा. पुरता ओळखून आहे तुझ्या जातीला. गेट म्हणजे घर वाटलं काय तुला बाचं ? का हा दोनशे अठरा बाळगणाराय तुला ?

**बाई २** गरती बाई हाय मी दादा–

**भोसले** हा, आहे ठाऊक. गरत्या बाईला सांगावं लागत नाही आपण कोण ते. फार बघितल्या गरत्या बाया तुझ्यासारख्या. दोनशे अठरा, या बाईची केस काय आहे ?

**भल्या** केस–(घसा खाकरून प्रयत्नपूर्वक) ही आली–आणखी म्हणाली का दाल्ला मारतो—रातभर रहाते म्हणाली...

**भोसले** दाल्ला मारतो म्हणून ? आणि तुझ्याकडे आसऱ्याला आली ही गरती नार ? दोनशे अठरा, अटेन्शन. गेटची ही शिस्त आहे का थट्टा ! उद्या या भागातल्या सगळ्या बाया नवरा मारतो म्हणून गेटावर रहायला मागतील–

भल्या — असं कुठलं व्हायलंा–

भोसले — शडाप. वर थोबाड करून बोलू नकोस. बाईला बाहेर काढ त्यौ. चले जाव–

बाई २ — येवढ्या रातचं जावं कुठं दादा–

भोसले — जहन्नममें जाव. नाही तर नवऱ्याकडे जा तुझ्या–

बाई २ — जीवच घील त्यो माजा–

भोसले — बला गेली. एक बाई जगातनं कमती झाली. बाईची जात एकदम हराम. गाजराची पुंगी–वाजवून फेकून द्यावी. जवळ केली का कापलाच गळा. चले जाव रंडी. दोनशे अठरा, आणखी ते तिथं कट्ट्यावर कोण झोपलंय ? वरतून रिपोर्ट झाला का जबाब कोण, तुझा बाप देईल ? उठव आधी त्यांना. इथं येऊन मरतात, गाव काय ओस पडला ? आणि हे कार्ट सकाळला घरी पोचव नाही तर भर नेऊन चिल्ड्रेन्स होममध्ये. बापाची चैन आणिक सरकारला तकलीफ. शूट केली पायजेत असली पोरटी. चल ती लॉकपची काय केस आहे काढ. बघतोस काय वळूसारखा ? कामं झटझट झाली पायजेत. हे काय सौंस्थान आहे तुझं दीडदमडीचं ? चल, लाग कामाला. बुढ्ढा घोडा कहींका. बाहेर काढ कोण आहे त्याला. आण इथं. सेनापती, लाकप खोल. सेनापती, आण त्याला इकडे. सेनापती, सलाम कर. (राक्षसी हसतो.) सेनापती ! त्या भिकारचोट संस्थानात कोण पण काय पण होत असे. सेनापती ! (उठून समोर आणून उभ्या केलेल्या चोराच्या पुढ्यात जाऊन उभा राहतो.) चोरी केलीन. . . . (चोराच्या मुस्कटात भडकावतो. तो मुस्कट पकडून वेदनेने वाकलेला.) चोरी करायला पाह्यजे हरामजादे. सेनापती, इथं थांब. याला जरा हिसका दाखवतो काय तो. 'भोसले–टच्' दाखवतो. (चोराला मानगूट पकडून दरदरा लकटत जिन्याने वर घेऊन जातो.

> काका केविलवाणा, गुदमरल्यागत उभा. बाई उभ्या जागी थरकापते आहे. तोंडात पदराचा बोळा कोंबलेला. मूल घाबरून अंग आक्रसून बसलेले. आता वरून मारल्याचे आवाज ऐकू येऊ लागतात. चोराचे विव्हळणे. त्याच्या दबल्या प्रार्थना, मारल्याचे आवाज, आणखी विव्हळणे, भोसलेच्या गुरकावण्या. मग वर शांतता. भोसले जिन्याने खाली येतो. मुद्रेवर तृप्ती, समाधान.)

सेनापती, कैद्याला खाली उचलून आणून बंद कर लाकपमध्ये. बाकी

उद्या मॉर्निंगला बघू. चोरी करतो. बाकी सांगितल्याप्रमाणे करून टाक. गेटवर लफडा नाही पायजेल. या गरतीला हाकून दे आधी. पोरट्याला अनाथघरात भर. आणखी हे कोण झोपलेत बघू— (वाघासारखा जातो आणि कट्ट्यावर झोपलेल्यांच्या कमरेत लाथा घालतो.) तुमच्या बाचा कट्टा आहे काय रे ! उठो पैले. उठो.

**बाई १** (धसकून उठलेली. गयावया करीत) न्हाई हवालदार साह्येब—मी न्हाई चोरी केली–मी गरीब बाई मानूस हाय साह्येब–मी न्हाई सा–साह्येब––(ओचे घट्ट धरून थरथरत उभी, तिच्या बरोबरचा बाप्या मागच्या मागे सरकू लागतो तोंडातल्या तोंडात गयावया करीत.)

**भोसले** ओच्यात काय आहे तुझ्या ?

(त्यासरशी बाईच्या ओच्यातले बोचके खाली पडते. एक क्षणभर तंग स्तब्धता. मग भोसले वाकून ते बोचके झपाट्याने उचलतो. तेवढ्यात बाईबरोबरचा बाप्या मागच्या मागे पळू बघतो. भोसले त्याला झडपतो.)

दोनशे अठरा, बाईला गेटवर घे.

(काका स्वप्नातल्यासारखा बाईला धरतो आणि गेटमध्ये नेतो. बाप्याला मागोमाग भोसले दरदरा खेचत आणतो.)

वर चल घेऊन तिला. चोरीची केस आहे. (बोचके तपासून) संध्याकाळला नोंद झालेलीच केस असावी. आणि हा (बाप्याला न्याहाळीत) साथीदार दिसतोय तिचा.

**बाप्या** न्हाई साहेब, गरीब मानूस हाय—

(भोसले फाड्दिशी त्याच्या तोंडात वाजवतो. त्याला वर ढकलीत नेतो.)

**भोसले** (वर जाता जाता) काढतोच तुझी गरिबी तीन ताड बाहेर, थांब. दोनशे अठरा, पहातोस काय वळूसारखा, बाईला वर आण. चोर गेटाच्या कट्ट्यावर झोपतात आणि तू काढ गेटात झोपा. अरे हे गेट आहे का मस्करी ! थांब रिपोर्ट करतो तुझा आता, सोडत नाही तुला, येरड्या–टाचा घासून मरायला लावतो तुला.

(बाप्यासकट भोसले वर निघून जातो. मग काका बाई २ ला घेऊन वर जातो. खाली भयभीत पोर बाई २ ला बिलगते. ती त्याला निग्रहाने बाजूला करून गेटबाहेर धावत जाते. मागून पोर धावते. अडखळून पडते. दबल्या आवाजात मुळूमुळू रडत

बसते. वर मारण्याचे नवे आवाज. विव्हळणे. प्रार्थना. दटावण्या. काका वरून जिन्याने हळूच खाली येतो. वरच्या प्रत्येक घावाच्या वेदना काकाला होत आहेत. त्याला ते आवाज ऐकवत नाहीत. बाई २ गेली हे तो पहातो. रडते पोर त्याला दिसते. पोराला तो उचलतो आणि जोरजोराने थोपटून उगे करण्याचे प्रयत्न करीत उभा राहतो. जणू काका स्वत:लाच उगे करतो आहे. वरच्या मारण्याच्या, विव्हळण्याच्या प्रत्येक आवाजाने तो कळवळतो आहे. मारणे, विव्हळणे, दटावण्या यांचे प्रमाण वाढत जाते आणि)

भल्या (अखेर सहन न होऊन ओरडतो) पुरे !

(यासरशी वरचे मारण्याचे, प्रार्थनांचे आवाज एकदम मागे गेल्यासारखे नाहीसे होऊन ललकाऱ्याची लांबलचक ललकारी ऐकू येते. शिंग वाजते.

ड्रमचा बीट सुरू होतो.

काका लीनपणे वाकलेला.

प्रकाशयोजना बदलते.

पुढे लवाजमा आणि मागोमाग श्रीमंत सरकारस्वारी धीरगंभीर पावले टाकीत प्रवेशते. श्रीमंतांचा चेहरा दिसत नाही.

डोक्यावर तुरेवाली पगडी. उपरणे. लांब कोट. सुरवार. हातात चांदीच्या मुठीची काठी.

ड्रमच्या लयीत श्रीमंत येऊन उभे राहतात.

पुढे असलेला मानकरी एक लांब भेंडोळे पद्धतशीरपणे उलगडून वाचू लागतो.

पडद्यामागून या फर्मानाचे शब्द ऐकू येऊ लागतात :

फर्मानाच्या पेशवाई पद्धतीचे शब्द.

'तुमच्या सेवेची बक्षिसी म्हणून श्रीमंतांनी आजपासून तुम्हास संस्थान बुंदवाड, दख्खनचे दिवाण नेमले असे...' इत्यादी.

फर्मान वाचून संपते.

श्रीमंत काकाला आशीर्वाद दिल्याप्रमाणे हात वर धरतात.

शिंग वाजत रहाते.

वेडे पार्श्वसंगीत सुरू होते. वाढते.

ड्रमच्या लयीत लवाजमा आणि श्रीमंत संथ पावले टाकीत निघून जातात.

काका वाकून थरथरत उभा. कुडीत क्षीणता आणि हर्ष दाटलेला.

प्रकाशयोजना पूर्ववत होते.

चौकीत स्तब्धता.

आता वरच्या जिन्याने इन्स्पेक्टर भोसले समाधानाने खाली येतो.)

**भोसले** (भल्याकाकासमोर येऊन) काय रे सेनापती—

**भल्या** (यासरशी ताड्दिशी, ताकदीने आणि लालबुंद होऊन) खामोष! कोण सेनापती? कुणासमोर जबान लांब चालवतोस, सुव्वर?—

(भोसले चांगलाच चक्करलेला.)

(त्याच ताकदीने आणि वजनाने) कोण सेनापती? दिवाण म्हण!

(भोसले जास्तच चक्रात.)

दिवाण म्हण. मुजरा कर. (डरकाळून) मुजरा कर नाही तर इथल्या इथे गर्दन उतरवली जाईल, हरामजादे. मु-ज-रा—

(भोसले भल्याकाकाचा हा नरसिंहावतार पाहून चांगलाच गडबडलेला.

घाईने मुजऱ्यासारखे काहीतरी करून तो गेटबाहेर चालता होतो.

काका सुन्न उभा. पाय लटपटताहेत.

पोर काकाकडे भेदरून पहात उभे आहे.

पडदा.)

★ ★ ★

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र.... दि ..............
वि. .................. क्र. ..................

# अंक दुसरा

[ भल्याकाकाच्या जावयाचे बिऱ्हाड, गावातल्या वाड्यातले. समोर बाहेरचा सामायिक व्हरांडा, त्यापलीकडे जावयाच्या बिऱ्हाडाची बाहेरली खोली दिसते. हिच्या एकीकडे स्वयंपाकघर आणि दुसरीकडे आणखी एक खोली. या दोन्ही दिसत नाहीत. त्यांची फक्त दारेच दिसतात.

व्हरांड्याच्या थेटच्या टोकाला खाली गेलेला जिना, हा प्रेक्षागृहात गेलेला. पलीकडे वर गेलेल्या जिन्याचाही एक भाग दिसतो.

जिन्याशी एक कट्टा. मजल्यावरची रिकामटेकडी म्हातारी निरुद्योगी माणसे इथे बसत असतात.

बिऱ्हाडाच्या बाहेरल्या खोलीत काकाचा जावई तंबोरा घेऊन गातो आहे.

जागरणाचा काका प्रेक्षागृहातून जिन्याने वर येतो. बिऱ्हाडाकडे जातो. म्हातारे पाय थकलेले. मुद्रेवर सुन्नपणा आणि एक डिग्निटी.

बिऱ्हाडी येऊन अंगावरचा गणवेष उतरवून घरचे कपडे करतो हे एका डिग्निटीने.

जावई काकाकडे लक्ष न दिल्यासारखा पण लक्ष देऊन गात रहातो. मुद्दाम बकरीताना मारतो.

काकाच्या मुद्रेवर याच्या यातना. पण डिग्निटी कायम.

काका आता स्वयंपाकघरात जातो. घशात बोटे घालून काढलेल्या ओकाऱ्यांचे जोरदार आवाज आता आतून येतात.

जावयाच्या गाण्यात या आवाजांचा व्यत्यय.

मग डिग्निटीनेच काका बाहेर येतो. स्वयंपाकघराच्या दिशेने घोटाळतो. एक दोन करपट ढेकर देतो. जांभई ताणतो. सगळ्यात डिग्निटी.

गाता गाता जावई काकाच्या एकेक आवाजाने त्रासिक आवाज करतो आहे.

स्वयंपाकघराकडे सगळी सामसूम. ]

**भल्या** (स्वयंपाकघराला उद्देशून) गोदे, चहा.

(स्वयंपाक घराकडून काही हालचाल नाही.)

(पुन्हा एकदा प्रयत्नवादी वृत्तीने जागरणाच्या आवाजात) च–हा.

(स्वयंपाकघर शांत, काकाच्या 'च–हा' वर जावई हा–हा–हा–ची एक तान मारतो. जावयाच्या गाण्याचा जोर वाढतो काकाची डिग्निटी तरीही कायम.)

**जावई** (मध्येच गाणे थांबवून) गोदे, कोणी आलय. (पुन्हा गाणे पुढे चालू)

(स्वयंपाकघरावर डोळा लावलेला काका आता थोडी वाट पाहून डिग्निटीनेच बाहेरच्या सामायिक व्हरांड्यात येऊन उभा रहातो.)

**भल्या** असं आहे, सगळा सरकारी मामला. पोट बोंबलून थकलं का मग चहा मिळायचा. रोजचा खाक्या हा. कारण काय ? फितुरी. पोटची पोर जावयाला सामील झाल्यावर बाप बोंबलतच पडायचा. काल रातचा उपास. काल संध्याकाळची हाटेलातली मिसळ भुकेच्या समुद्रात पंचपात्रीभर आचमन झाली. कुठे गेली पत्त्या नाही. डबा त्या पोरट्याने हजम केला. कालची रात्र भलती अफलातून. त्या अरबी भाषेतली वाटते. काय काय म्हणून व्हावं एका रात्रीत ? (आठवून खुष होत.) भोसल्याचा पार खिमा केला. कसा थंडगार कांद्याच्या भज्यासारखा झाला होता लेकाचा. रोज नवसागर घोटून माजत होता. म्हातारं माणूस बघून चेवतो काय. मुजरा करायला लावला. (मिशीवर ताव मारता मारता जरा थांबून) खोटं वाटतंय. (पुन्हा मिशीवर ताव मारत) पण लावला. पार मिशी उतरली होती ना त्याची, तुटक्या जिलबीगत लोंबत होती. खामोष...कुणासमोर जबान लांब चालवतोस सुव्वर, मुजरा कर...,स्टेट दिवाणापुढे या सबइन्सपेक्टरड्याचा रुबाब,

हडेरहप्प ! त्या पोरट्याची मॅनेजमेंट तेवढी अनाथगृहात झाली ते बेश झालं. भले लोक, अनाथगृहाचे. बसायला ताबडतोब ष्टूल दिलं, गादीचं. शिवाय कसे आदब राखून बोलत होते. ती वरची बाई जरा मजाक करत होती तिला चमकावलं. 'बाई, समोर कोण आहे तुमच्या ?' म्हणून, तशी तेलातल्या फुटल्या पुरीगत बघत होती तोंडाकडे. हमारे सामने हमारी मजाक, हडेरहप्प ? डोळे फाडून रजिष्टरमधली सही वाचत होती. भलोजी त्रिंबक कुळकर्णी, दिवाण बहादुर, बकल नंबर दोनशा अठरा–

(मागे काकाची चटपटीत मुलगी गोदू स्वयंपाकघराकडून बाहेरल्या खोलीत आलेली)

**गोदू** (नवऱ्याला) चहा ठेवू का ?

**भल्या** (हे ऐकून तत्परतेने गोदूला) हां, ठेव.

**जावई** (हे ऐकून खडूसपणे) इतक्यात कशाला करतेस चहा ? आता एवढ्यात तर झाला. मग कर, मग. तोंडात पान आहे माझ्या, दिसत नाही तुला !

(गोदू तरातरा स्वयंपाकघराकडे जाऊ लागते. वाटेत काकाकडे लक्ष देऊन दुर्लक्ष करते. गोदू स्वयंपाकघरात जाते आणि जावई आसुरी तान मारतो.)

**भल्या** शपथेवर सांगतो, ष्टेटमध्ये असता तर तपेलंभर पाण्यात टाकून चहाच्या भुकटीसारखा उकळला असता. तंबूऱ्याचा राहू दे, साधा भरताचा भोपळासुद्धा लागू दिला नसता हातात याच्या. बैठका होतात याच्या. एक बैठक तरी मारली आहेस म्हणावं ? मग जोरजोडी लढंतगळतं राहू देच. दंडाच्या काड्या नि गवई. थूत तेरे की...पण पोरगी देऊन अडकलोय. ष्टेटमध्ये होतो तेव्हा बरोबरीने बात नाही केली, मध्ये माणूस घालून काय तो व्यवहार. त्याचा सूड घेतोय, सूड. आणि कार्टी गोदी त्याला सामील. (मिशीवर ताव) समजलात कोण ? दिवाणबहादुर ष्टेट ऑफ बुंदवाड भलोजी त्रिंबक कुळकर्णी, बकल नंबर दोनशे अठरा. उफराट्या तकदिरानं दिल्लीची कुऱ्हाड कोसळून शिबंदी कामगाराचा हुद्दा, आमच्या पगडीचा तुराच छाटला गेला, त्याची भरपाई काल राती सरकारहुजूरांनी अखेर केली. सेवेची कदर राखली, अंतर दिलं नाही.

**जावई** (गाता गाता ओरडून) काय ग, या पिकदाणीत काल घाण कुणी करून ठेवली होती मी नसताना ?

गोदू (आतून) काय की. मी थोडीच पान खाते ? खातात त्यांना विचारा.

जावई (काकाकडे पहात थुंकून) घराचं संस्थान झालंय—(शर्टावर पानाची पिंक पडते ती हाताने निपटीत) टापटीप म्हणून राहिली नाही. (पिकदाणीत थुंकतो. उठून तंबोरा उभा करून ठेवतो आणि गुणगुणत बाजूच्या खोलीत जातो.)

भल्या पोर झालं; त्याचं वजन ? चार रतल. तोबा. अबे हे पोर का रताळं ? चिरगुटात शोधावं लागतं, रडलं तर घुंगुरटं गुणगुणल्यागत वाटतं. गोदी जन्मस्त कशी वरवंट्यासारखी होती कार्टी. बाराच्या तोफेसारखं नरडं बुलंद होतं कार्टीचं. तिचं पोर चार रतल ? थूत, निकम्मां गवई कहींका, आणखिन बारशाचा बेत—जसं काही कुणाला कधी पोरच झालं नाही असा केलाय. आज आता दिवसभर झोपेचा बट्ट्याबोळ...

(तेवढ्यात स्वयंपाकघराकडून गोदू तरातरा येते.)

गोदू जागच्या जागी एक वस्तू सापडेल तर रामाचं नाव. आता ते दुपटं कुठं गेलं बाळाचं ? सकाळी दांडीवर होतं—

भल्या (डिग्निटीने) तेवढा—चहा—

गोदू (धुमसून) चहा, तुम्हाला चहा सुचतोय ! (तरातरा पुन्हा स्वयंपाक-घरात निघून जाते 'दुपटं कुठं गेलं', पुटपुटत.)

भल्या (पुन्हा दिवाणाच्या डिग्निटीने बसतो.) सुब्बर मुजरा कर. भोसल्याचा निकाल लावला. बारसं म्हणजे पक्वान्न असेल काहीतरी. पोराचं बारसं केलं होतं तेव्हाची शेवयाची खीर...अजून घशाशी येते. पोरगा गेलाच, बारशानंतर अकराव्या दिवशी. पोरगा गेला नि पोरगी उरली. नवऱ्याची होऊन बापाशी वैर करायला.

(बाहेरून कुणीतरी चंद्राकाकू येतात.)

भल्या या.

चंद्रा (घुटमळून) गोदूताई आहेत का आत ?

भल्या आहेत तर. चला, आत.

(त्या उगीच अंग चोरीत आत जातात.)

ही पहिली साळू आली. आता आणखी येतील, रोज येतात. जागरणाचं जरा अंग पसरून लेटलं का रिपोर्ट गोदीकडे—तुमचे वडील म्हणजे

अगदी सौंस्थानी आहेत हो. झोपले म्हंजे कपड्याचं सुद्धा भान नसतं. अबे झोपल्यावर कपड्याचं भान कसं ठेवायचं ?

(इकडे तिकडे जावई नाही असे हेरून पानाचे तस्त पुढे ओढतो. पान बनवू लागतो. एकीकडे कडाडून एक जांभई येते. मग तुस्त बसून राहतो झुलत, पान चघळीत. मागे जावई येऊन उभा.)

(स्वत:शीच) सुव्वर, मुजरा कर, मुजरा कर. दिवाण म्हण.

(जावई घसा खाकरतो. काका भयंकर दचकून तस्त बाजूला सारून आपला संबंध नसल्यासारखा बसून रहातो, डिग्निटीने, पान चघळीत. सासरा जावयात काही थंडे क्षण.)

**जावई** (ओरडून) अग, चहा. लौकर. (गुणगुणत रहातो.)

(काका हुशारलेला.)

अग, चहा आणतेस ना ? छे...

**गोदू** (आतून) आले, आले—

**जावई** आले आले काय ? चहा हवाय.

**गोदू** अहो, आले म्हणते ना—

**भल्या** (स्वत:शीच) भले बहाद्दर.

**जावई** चहा. काय घर आहे का संस्थान हे ?

**गोदू** (आतूनच) आलेच—

**जावई** (जरा वाट पाहून डरकाळत) चहा आणतेस का जाऊ मी हॉटेलात ?

**गोदू** (आतून) आले म्हटलं तर—

**भल्या** (स्वत:शीच) बोंबलू दे लेकाच्याला. बोंबल म्हणावं अजून. पण चहा येणार आता.

**गोदू** (आतून एकच कप चहा घेऊन येते) एवढं ओरडायला काय झालं ते ? चहा तयारच होता केव्हाचा. मघा विचारलं तर म्हणालात तोंडात पान आहे.

**जावई** मग ते पान काय अजून राह्यलय तोंडात ?

**गोदू** अहो, चंद्राकाकू आल्या त्या आत. दुपारच्या सैंपाकाचं बोलत होतो आम्ही. (चहाचा कप नवऱ्याच्या पुढ्यात ठेवलेला, वळून स्वयंपाकघराकडे) बरं बरं हो काकू. जाता ? बरं. मी येते मग जराशानं—

**भल्या** (स्वत:शीच) एकच कप, हडेरहप्प.

**गोदू** (नवऱ्याला) जिलब्यांबरोबर काय करू ?

**भल्या** (न रहाववून एकदम) वांगीभात.

**जावई** (काकाकडे पहातो. काका डिग्निटीने बसलेला.) वांगीभात सोडून काहीतरी कर. (एकीकडे रुची घेत चहा पितोच आहे.)

**गोदू** फुलवराची खिचडीच करते. आणि ताज्या कैऱ्यांचं लोणचं आहे. (काकाच्या जिभेला पाणी.) झालंच तर वरणभात, दोन भाज्या, पापड कुरड्या आणि वांग्याचं भरीत—

**भल्या** (उत्स्फूर्तपणे) भरीत ? वा.

**जावई** (चहा संपवून कपबशी खाली ठेवीत) भरीत नको.

**गोदू** बरं. (स्वयंपाकघराकडे जाऊ लागते. वाटेत काकाला पाहून एकदम सूर आणि मुद्रा बदलून) आणखिन बाबा, आलात ते बसलात बैठक घालून. अंघुळबिंघुळ नाही का करायची तुम्हाला ? बंबातलं पाणी गार होऊन गेल्यावर उठा म्हणजे पुन्हा बंब पेटिवते तुमच्यासाठी. एकेक सौंस्थानी सवयी बरं या. संस्थान गेलं तरी त्या नाही जात. चला, आधी अंघुळ करून घ्या. पुन्हा मोलकरीण होती, ती पण नाही. (जळत्या, अर्थपूर्ण नजरेने काकाला न्याहाळते. काकाच्या जावयाला इथे नाजूकसा खोकला.)

चला, उठा अंघुळीला आधी.

(काका जरा रागानेच उठून जातो तिच्यामागून. जावई जे झाले त्यात संगीत आनंद घेत बसलेला. आता साध्याच पोषाखातला पण अर्ध्या चड्डीतला एक माणूस करकरत्या पोलिसी वहाणा वाजवीत जिना चढून वर येतो. काकाच्या जावयाच्या बिऱ्हाडाकडे पोचतो.)

**इसम** (जात असता) काकासाहेब–ओ काकासाहेब–भल्याकाका — (बिऱ्हाडात डोकावून) भल्याकाका हायती काय घरात ?

**जावई** कोणाय ? हां, अंघोळीला गेलेत वाटतं. काय आहे ?

**इसम** त्यान्लाच भेटायचं हुतं—टैम लागंल काय यायला ? मला बी जरा धाईच हाय—

**जावई** (तुच्छतेने) धाई आहे ? त्यांना नसते—धाई. अंघोळीला अर्धा तास ! बसा, निवांत, नाहीतर या जाऊन—

**इसम** (जरा टेकल्यासारखे करून उठत) नगं—निगतोच,

**जावई** निघता ? बरं, या.

**इसम** त्यवडं—सांगायचं हुतं काकाला—

**जावई** काय ?

**इसम** सांगा का येकशा बावन्न यिऊन गेला.

**जावई** एकशा बावन्न ?

**इसम** हा, बकल नंबर आपला.

**जावई** म्हणजे पोलीस आहात तर तुम्ही.

**इसम** हा. काकाला त्येवडं सांगा बरं का. म्हणावं—

(काकाच आतून बाहेर येतो.)

**भल्या** कायरे काय आहे एकशा बावन्न ?

**इसम** (त्याला धरून बाहेर आणीत) जरा बाहेर या–बाहेर–(दोघे बाहेर येऊन उभे.) काका, त्या भोसले सबइनिस्पेक्टरची बाईल राती पळाली कुणासंगं—

**भल्या** मग ? तिला काय मी पळवली ?

**इसम** काका, मजाक करन्याची टैम न्हवं. सकाळधरनं भोसल्या भलताच औट हाय. हा दारूमंदी टेर दिसरात, तिला ज्वानीचा उफाडा. ह्येचा भारी जीव तिच्यावर पर दारूपाय गडी कामातून गेल्याला. टैमाला दाना न्हाई गावला चोचीत तर पिंजऱ्यातलं पाखरूबी उडाय बगतंय चारी वाटा. मग ही तर बाईच. ते जाव द्या; पर सुपडा पार साफ हाय भोसल्याचा न् आता कोन घावल तेच्या हातामंदी, त्येचा बी. मामला योकदम बुरा हाय आता. काका मुद्दाम तुमाला सांगाय आलो. आता हुशार ऱ्हा ड्यूटीवर. काय बी मिष्टिक हू दिऊ नगा. जखमी वाघावाणी उभा फाडंल भोसल्या कोन घावंल त्येला. टैम लई खराब आला हाय.

**भल्या** (मुद्रेवर हे ऐकताना बधीर स्वस्थता. मिशीवर ताव मारीत) ठीक है. देख लेंगे हम. भोसल्याची मजाल नाही आमच्यासमोर भुवई वाकडी करण्याची. जा तू. हम है.

(इसम काकाचा स्वस्थ चेहरा पाहून पुढे काही बोलू शकत नाही. खांदे उडवून जातो आला तसा जिना उतरून.)

(मागे खोलीत गोदूने काका बाहेर बोलतो आहे हे पाहून तिच्या नवऱ्याला शिऱ्याने भरलेली बशी आणून दिलेली. तो

शिरा रुचीने खातो आहे. ती बाजूला आदब राखून टेकलेली. जावई बशी खाली ठेवतो. हात झाडतो. तोंड पुसतो धोतराच्या सोग्याने. काका आता बिऱ्हाडात येतो. नाकपुड्या फुलवून वास घेतो शिरा खाऊन झाल्याचा. गोदू शिऱ्याची रिकामी बशी उचलून वळते )

**गोदू** छान, बाबा, छान हं. अंघुळ टाकून पुन्हा कुठं गेलात ? आता बसा अंघुळीशिवाय. आणि विचारायचं नाही; नाही, म्हणत होते पण विचारतेच.

(काकाला ठसका.)

बाबा, त्या गंगू मोलकरणीशी काय थेर केलेत तुम्ही ?

**जावई** (माहीत असून खोचकपणे) थेर ? ते कसले ?

**गोदू** अहो आपली गंगू मोलकरीण—तिच्याकडून अंघुळीत पाठ घासून घ्यायचे चोरून.

**जावई** (खोटेच आश्चर्य दाखवून) म्हणतेस काय ?

**गोदू** तर काय. न्हाणीशी कामाला म्हणून जायची आणि हे उद्योग चालायचे. मला तरी काय ठावकी, त्या यमुनाकाकूंनी बघितल्यांनी परवा. असं मेल्याहून मेलं झालं मेलं मला—

**जावई** अस्सं.

**गोदू** आणि यवढ्यावर भागतं तरी पुष्कळ होतं.

**जावई** असं ? काय केलं आणखी ?

**गोदू** करणार काय, सांगायला मेली शरम वाटते...रात्री जिन्याशी अंथरूणात तिच्याकडनं अंग दाबून घ्यायचे.

**जावई** कोण ? अग काय म्हणतेस काय तू गोदे ?

**गोदू** तर. दांडेकरांचा भाऊ रात्री सिनिमास्ने येत होता त्यानं बघितलंन. सगळया चाळीत बोलत सुटला.

**जावई** (काकाकडे जाळत्या तुच्छतेने पहात) अच्छा ?

**गोदू** तिला चांगली घेतली फैलावर मी. तशी म्हणते, म्हातारडं हाय, काय होतं. त्याला सुख होतं, मला पण चार पैसे मिळतात. झाल्या दिवसाचे घरकामाचे पैसे चुकते केले मेलीचे आणि आधी हाकलून दिली. (एकदम काकाकडे वळत तावातावाने) बाबा, मी म्हणते, हे पैसे

कुठनं आले बरं तिला रोज रात्री द्यायला ? घरात देता महिन्याचे वीस रुपये. हादडता दोन माणसांचं. आणि वर या चैनींना पैसे असतात होय तुमच्याकडे ? संस्थान, संस्थान भरलंय ग बाई अंगात नुसतं.

(शिऱ्याच्या बशीसकट तरातरा आत जाते.)

जावई (आसुरी आनंद घेत) चला, म्हणजे मोलकरीण गेली. आनंद आहे.

(तेवढ्यात बशी आत ठेवून गोदू तरातरा बाहेर येते)

गोदू आता पुन्हा बैठक नका मारू बाबा. कामं पडलीत गाडाभर नि तुम्ही बसा जिथे तिथे शिराळशेटीसारखे. (बाजूच्या खोलीकडे बोट दाखवीत) त्या खोलीत पाव्हण्यांची बसायची वेवस्था करायचीय सगळी. नि इथं बारसं होईल. चला, तो तेवढा पाळणा तिकडे सारा. आणि या टेबलखुर्च्या शेजारी हणमंत्यांकडे न्या. तेवढ्या ट्रंका उचलून खाटेखाली टाका. मेली होती मोलकरीण ती गेली ! ही खालची बैठक उचला. केर हवा काढून घ्यायला. आत जाऊन अंथरून तक्के ठेवायला हवेत. त्यांचे अभ्रे आहेत कपाटात, ते घाला. झालंच तर पानं, तंबाकू, सुपाऱ्या आणायला लागतील. मग मंडळी आली म्हणजे धावपळ नको. तो तंबोरा, तबले सगळं सध्या त्या तिकडे रचा. आलं ना ध्यानात ? ओढा तो पाळणा आधी—

(भल्याकाका दातओठ खाऊन पाळण्याला हात घालतो आणि पाळणा ढकलीत जावयाच्याच दिशेने निघतो.)

गोदू अहो तिकडे कुठे नेताय पाळणा त्यांच्या अंगावर, बाबा ? इकडे ठेवा तो.

(काका पाळणा सांगितल्या जागेकडे नेऊ लागतो. जावई जागचा उठलेला. गोदू जाजम उचलू लागलेली.

काळोख.

आणि उजेड होतो तेव्हा : जावयाचे घर आवरलेले. बाहेरच्या दर्शनी खोलीत शृंगारलेला पाळणा. इतर सजावट. बाजूच्या अदृश्य खोलीत पाहुणे बसलेले. त्यांची गडबड. जावई नि गोदू पाहुण्यांच्या सरबराईत. काका जिन्यापासच्या कट्ट्यावर चिरगुटातला नातू आणि आणखी तीन चार पोरे सांभाळीत वैतागून बसलेला. डोळ्यांवर झोप. कुडीत शीण दाटलेला. व्हरांड्याच्या जिन्याने आणखी एक दोन जोडपी येतात. येणाऱ्यांना काका जिन्यापाशी पेंग झाडून एका डिग्निटीने

मार्गदर्शन करतो. गोदू बाईला स्वयंपाकघरात नेते. पुरुषाला जावई बाजूच्या खोलीत नेऊन बसवतो.

जावयाचे बिऱ्हाड गजबजते. पेटीतवल्याचे आवाज. संभाषणे, हशे. गोदूची या खोलीतून त्या खोलीत धावपळ. जेवायला उशीर होईल, चहा तरी घ्या, असे आतल्या कुणा कुणाला धावपळीतही सांगते. पार्श्वभागी लहान पोरीचे रडणे. काका मांडीवरच्या नातवाला आणि आसपासच्या चिरगुटातल्या पोरट्यांना थोपटून थापटून गप्प करण्याचे प्रयत्न पेंगल्या डोळ्यांनी करीत रहातो! पुष्कळ घोडे खिंकाळावेत तसा प्रचंड हशा उसळतो. काका याचा संताप पोरांना जलतरंगासारखे आळी–पाळीने थोपटून बाहेर टाकतो. ओरडा कमी होतो. )

**भल्या** चहा हजम झाला, भुकेच्या खाईत कुठे गेला पत्त्या नाही. शिरा–मिळालाच नाही. तो त्याला–जावयाला. थोडे देरसे खाना मिलेगा. जिलब्या–वांगीभात पण असणार. ओल्या गरम जिलबीबरोबर मसालेदार वांगीभात, म्हणजे सवाल नाही. जोडीला भरीत, वांग्याचं. लसणाचा वास दिलेलं. ( बाजूच्या पोराला ) अरे गाप, कार्ट्या, पड गुमान नाही तर जिभेला गाठ मारून टाकीन! नालायक. गोदीचं बारसं केलं होतं.–ष्टेटमधल्या झाडून सगळ्या सरदारणी बोलावल्या होत्या गोविंद घ्या—गोपाळ घ्या करायला. राणीसाहेब सुद्धा दाराशी बगी थांबवून बारशाची साखर खाऊन मग देवदर्शनाला गेल्या. रिसाल्यातले सात स्वार दाराशी आलेल्याला गार्ड ऑफ आनर देत खडे होते. रात्री कीर्तनाला पुण्याहून स्पेशल बुवा आणला होता–कोण होता याद नाही–तो तिकडे हरिभक्तीचं कीर्तन करीत असताना आपलं ध्यान होतं सरदार डुबोल्याच्या नव्या सुनेवर. इमारत टुमदार होती. (पुन्हा जवळच्या कुठल्या तरी पोरावर संतापत) बोंबल. तुझा बाप नाही इथे. भल्याकाका है भल्याकाका. दिवाणबहादुर भलोजी त्रिंबक कुळकर्णी बकल नंबर दोनशे अठरा. हां.

( तिकडे बिऱ्हाडात हशाचा नवा कल्लोळ. कुठून तरी एकजण पलीकडे येऊन उभा. तो आता दबकत दबकत काकाच्या दिशेने सरकतो. )

**एकजण** काय ? बारशाचा समारंभ जोरात दिसतोय ?

**भल्या** (डिग्निटीने) ऊं ! हूं.

**एकजण** तुम्ही–त्या गोदूवहिनींचे—

भल्या बांपं.

एकजण वाटलंच. इथंच असतो–वर. बघतो तुम्हाला. पण म्हटलं शंका फेडून घ्यावी. (येऊन कट्ट्यावरच काकापासून जरा लांब टेकतो.)

भल्या तसे सरकून घ्या. पोराच्या तंगडीवर बसाल.

एकजण (सरकत) हो. सरकतो ना. तुमच्याकडे हे काम आलं वाटतं ? (पोरे दर्शवितो.)

भल्या हूं. का ? तुमचं पोर असलं तर आणा की.

एकजण मला पोरच नाही. म्हणजे—लग्नच झालेलं नाही माझं—

भल्या मग पोर नाही तेच बेश आहे. काय करता ? रोजगार ?

एकजण पोष्टात असतो. टेम्परवारीच आहे. तुम्ही–रिकामेच असता वाटतं ?

भल्या नाही. नोकरी करतो. संस्थानात. बुंदवाड ष्टेट, दख्खन. जरा त्या पोराच दुपटं बांधा. मुतेल कार्टं.

एकजण ( लांब सरकून बसत ) अच्छा ? इथं अगदीच हे वागवतात तुम्हाला. दिसतं म्हणून बोलतो.

भल्या घ्या. मुतलं. ( काका पोराच्या दुपट्यानेच पुढले सर्व करतो. )

एकजण आता हे पोरं सांभाळायला तुम्हाला सांगणं—

भल्या गप लेका, थोतरीत मारीन रडलास तर. कटकट तिच्या मायची. ( हे पोराला. )

एकजण नाही. पोर आहे, रडायचंच. पण मोठ्या माणसांना कळायला हवं की नको, म्हणतो मी. म्हणजे आईबापाना—( आता जरा प्रशस्तपणे काकाशेजारी बसलेला.)

भल्या आईबापाना ? आईबापाना कळत असतं तर तुमच्यासारखे कशाला झाले असते ? जल्माला येऊन ( पोस्टाचे शिक्के मारल्याचे आविर्भाव करीत ) हे करणारे ?

एकजण ( नाउमेद न होता ) गमत्ये दिसता तुम्ही.

भल्या आम्ही का तुम्ही ?

एकजण तुम्हीच की.

भल्या मी गमत्या नाही.

एकजण ( हसत ) अगदी खरं.

भल्या नाही म्हणजे नाही. ओळखत नाही तुम्ही मला.

**एकजण** ( हसतच ) बरोबरच आहे.

**भल्या** चावटपणा करताय होय म्हातारा बघून ?

**एकजण** ( जरा वरमून ) छे हो. चावटपणा कसला.

**भल्या** मग जा—उद्योगाला. नाही तर बसा इथं ही पोरं राखत.

**एकजण** ( उठत ) नाही—मोकळाच होतो, सहज म्हटलं चार गोष्टी—

**भल्या** तमाखू आहे तमाखू ?

**एकजण** ( उजळून पुन्हा बैठक मारीत ) हो, आहे की, वर सुपाऱ्यासुद्धा आहेत. ( काढून ) घ्या. अस्सल जर्दा आहे. एकदा खाल, दहादा मागाल. घ्या.

**भल्या** ( घेऊन फक्कन तोंडात टाकीत ) ठीक वाटतोय. वस्तू बऱ्यापैकी आहे पण नंबरी नाही. ( तमाखू पोटात पोचताच काका जरा प्रशस्त होतो. ) मी कोण ते हवंय तुम्हाला ?

**एकजण** गोदूवहिनींचे वडील.

**भल्या** त्याला झाली सत्तावीस वर्षं—तुमच्या त्या गोदूवहिनीचा वडील झाल्याला. मी भलोजी त्रिंबक कुळकर्णी, दिवाण बहादुर छेट ऑफ बुंदवाड, दख्खन. (थोडा थांबून) बकल नंबर दोनशा अठरा.

**एकजण** काय म्हणालात ?

**भल्या** सुनता नही कंबखत ?

**एकजण** तसं आलंच म्हणा लक्षात...

(बिऱ्हाडी मोठा हशा, ओरडा.)

**भल्या** रिटायर शिबंदी कामगार.

**एकजण** कामगार का ?

**भल्या** हडेरहप्प.

**एकजण** (जरा टरकत) काय झालं ?

**भल्या** शिबंदी कामगार—कमांडर इन चीफ. दीडशाची शिबंदी आमच्या अंडर होती. पंचेवीस घोडे, तीन उंट.

**एकजण** (याने मजा वाटून) बरीच मोठी असामी होतात तर तुम्ही.

**भल्या** प्यारे. युनिफार्म, फिती, बिल्ले, कमरेला तलवार आणि डोक्यावर मंदील ठेवून हत्तीवरून वाड्यावर जायचे आम्ही—सर्कस ट्रेण्ड जनावर होतं, सोंडेनं सलाम करायचं आम्हाला—एक दिवशी ते पण गेलं मरून. म्हातारं होतं. तर असे वाड्यावर जाताना आम्ही,

गेरहाटसाहेबाच्या मडमेनं आम्हाला पाहिलं. गेरहाटसाहेब—कोण होता, आहे ठाऊक ? हुजूर डेपुटी कलेक्टर. अंग्रेज. गावठी नव्हे, ऐनजिनसी. मडमेनं पाहिलं आणि साहेबाच्या पुढल्या गार्डन पार्टीला आम्हाला इनव्हिटेशन आलं. तिनं साहेबाला विचारलं, हा एवढा खानदानवाला आदमी कोण ? राजाचा भाई तर नव्हे ? पार्टीत मडमेशी शेकहँड केला आम्ही. साधा नव्हे, सपशेल —घंटाभर हात चोळत होती फुंकर घालून.

**एकजण** हें...कल्पनाच येत नाही तुम्हाला असं नुसतं पाहून. कमाल आहे. आदरच वाटू लागला हे ऐकून. घ्या, थोडी घ्या की. (जवळची भांगेची गोळी पुढे करतो.)

**भल्या** क्या है ये ?

**एकजण** काही नाही, थंडाई. बरं वाटतं एकाद्या गोळीनं.

**भल्या** हां हां. क्यौं नही. ( गोळी घेऊन जबड्यात टाकतो. ) और एक लाव एकीनं काय भागणार ? प्यारे, ट्रेटमध्ये रममध्ये घोटा करून घेत असू ना आम्ही. क्या मजा आता था. नाहीतर तुमच्या या गोळ्या. आण आणखी एक. ( आणखी एक गोळी घेऊन जबड्यात सोडतो ) व्यसन करना तो ऐसा करना, जैसा जंगलका हाथी अपनी जोडीदारनसे मिलता है.

**एकजण** ( आणखी एक गोळी पुढे करीत ) घ्या, आणखी घ्या हवी तर— आहेत आपल्याकडे--

**भल्या** ( हाताने सबूर करीत ) पानी मंगता है. ( उठतो. दबकत दबकत बिऱ्हाडाकडे निघतो. बिऱ्हाडात शिरतो. आत गोंधळ चालू. तांब्याभांडे घेऊन काका पाय ओढीत बाहेर येतो. मूळ जागेकडे येतो. ) अब ठीक हुआ. ( घटाघटा पाणी पितो. ) लाव और एक प्यारे--बंभोले. ( एकजणाजवळून आणखी गोळी घेऊन आणखी पाणी पितो. ) लेव. तुम भी पिओ. जेवणाचा पत्त्या नाही अध्याप. बाजार झालाय घरात सगळा. पोलिस कोडताचं आवार झालंय नुसतं. आत एक बाई येऊन सरळ अंगावर धडकली. वर म्हणाली, बाई-माणूस येतं समोरून, दिसत नाही ? हम बोला, कौन बाईमाणूस ? साडी गुंडाळली म्हणजे बाईमाणूस होतं का काय ? तशी गेली फणकारत. अरे इससे हमारा गंगाराम अच्छा था. काय शालीन पोरगा.

एकजण गंगाराम ?– कोण हा ? घ्या–अजून घ्या हवी तर– (गोळी पुढे धरलेली )

भल्या गंगाराम––नाटककंपणीतला पोर होता. स्त्रीपार्टी. पण एकदा तो शालू नेसला. ते गोळे पहेनले, तो टोप लावला, की झक मारती थी मेनका उर्वशी. हां. ऐसा मारू. ( नवी गोळी जबड्यात सोडलेली. ) सरकारस्वारीची निहायत मर्जी बसली त्याच्यावर. फर्मान सुटलं, कंपणीचा एक माणूसदेखील स्टेट हद्दीबाहेर सोडायचा नाही. आमची शिबंदी बसली होती सख्त पहाऱ्यावर चौदिशा. आखिर गंगाराम आला. क्या आक्टिंग था उनका प्यारे–ओ हो हो –शर्टाच्या पदरानं डोळे पुशीत बोलला, नाथ ! नाथ बोलला, प्यारे–नाथ. पदर पसरतो, नाक धरतो, पण आमच्यावर दया करा. आमच्या कंपणीला चुडेदान द्या. दहा रोज झाले खेळ झालेला नाही. अन्नान्न दशा झाली. वाड्यावरून छळ होतो हो छळ होतो. तुम्हीच आम्हाला सोडवा बरं, तुम्हीच सोडवा. मालूम है तुम्हे ? रमचे दोन पेग मारले, चार घटका रातीला हद्दीवरचे पहारे उठवले आणि कंपणी हद्दीपार झाली. दुसऱ्या दिवशी धुल्ला नाचले श्रीमंत संतापून ! शिबंदीत चार माणसं डिसमिस झाली, पण आम्ही बचावलो. नाहीतर प्यारे, गंगारामसाठी देशोधडी लागायचा वख्त आला होता. ऐसा मासूम लडका था. ती गंमत दिवाणकीत नाही प्यारे...

(एकजण आता नुसताच हसत रहातो भंगडसारखा. काकावरही क्रमशः अमल चढतो आहे.)

हिंमत होती तेव्हा. शान होती. कडक होता मामला. अब क्या उरा. रडू दे पोरट्याला–रड म्हणावं नरडं बसेपर्यंत कार्ट्या. और जोरसे. (एकजण रडत्या पोराला थोपटतो.) पेटमें आग लगी है ऐसा मालूम पडता है. पण तबीयत आता खूब आहे, प्यारे, कसली फिकीर नाही. (एकजण नुसताच हसतो आहे.) पांडोबा चितारी मालूम है ! रखमा चितारणीचा नवरा. और रखमा चितारीण ? बहुत रसीली औरत. पांडोबा महिने महाल कुणाकुणाकडे बायकोला लावून दारू पिऊन टेर असायचा. एक दिन रखमा बोली, मालक, एक हौस पुरवा. हम बोला कायको हौस ? रखमा बोली, धनी, हाथीउप्पर बैठके सैर करना ऐसा लगता है हमकू. प्यारे, ऐकतोयस ना तू ? एक रखमा, दुसरा गंगाराम, और बाकी सब हराम. हत्तीवरून रखमाके माफिक हलक्या बाईला कशी फिरवायची ? हत्तीवरून जायची एक सरकार-स्वारी, दुसरा दिवाण आणि तिसरे आम्ही–शिबंदी कामगार. रखमा

आमच्या हत्तीवरून फिरती तर सगळीकडून विचारा येणार, काय भानगड आहे? गवगवा होणार. वाड्यापर्यंत खबर जायला उशीर काय मग? खबरे असतातच. चाकरी खतम. श्रीमंतांची खफा मर्जी. फिरभी किया हमने, प्यारे, करके दिखाया, हां. रखमा चितारणीला सजवली पायापासून मस्तकापर्यंत अंग्रेजी पोषाखात आमच्या जवळच्या. कोट छातीला जरा टाइट झाला, बाकी सब मापके माप बराबर आया. ब्रीचिससुद्धा. आणि घेतली बरोबर हत्तीवर नि केली सैर गळ्यात हात टाकून दिवसाउजेडी, सर्वांसमक्ष. बहोत मजा आला प्यारे, फार मजा आला. ओहोहो...अबे एकदा धीर चेपल्यावर हात नुसता गळ्यातच काय म्हणून? दे, टाळी दे!

**एकजण** वा, वा, वा, वा, वा,... (एवढेच म्हणत भंगड हसतो आहे कायम.)

**भल्या** रखमा खूष, आपण खूष, दिवाणकी फुकट उसके सामने! पुढे पांडोबानं हैवानानं नाक तोडलं एक दिवशी तिचं–रखमाचं–दातानं ऊस पेचावा तसं–लचका काढला मांसाचा उरावर बसून—काय रगत वहात होतं. ओ हो हो...प्यारे, बहोत रगत... (काका गलबलला आहे.) बघवत नव्हतं लौंडीकडे...त्या किंकाळ्या...प्यारे गोळी दे... गोळी दे आणखी एक...

(एकजणाने दिलेली गोळी काका कशीबशी घशात लोटून वर घाईने पाणी ढोसतो. जावयाच्या बिऱ्हाडातून पुन्हा एक राक्षसी हशा उसळतो. ओरडा. गाणेबजावणे.)

हरामजाद्या पांडोबाला जन्मठेपेत गोवून जेल दाखवला असता तरी थंड वाटलं नसतं जिवाला. पण ते सुद्धा नाही जमलं. नालायक! काय नाक होतं लौंडीचं. बिलकुल नथीचं नाक. बहुत थंडा लगता है अब–और तेजभी. चीज असली है. (भोवतालच्या पोरांकडे पहातो आहे धूसर नजरेने.) किडे कहींके. कसे वळवळतात. प्यारे माणसानं कसं असावं? हाथीके माफिक. तुला ठाऊक नसेल, ग्रेट ऑफ बुंदवाडवर ॲग्रेशन झालं होतं एकदा. (इसमाच्या मुद्रेवर कायम भंगड हास्य.) हां, ॲग्रेशन. चढाई! लगतच्या अंग्रेजी मुलखात रोडचं काम चाललं होतं ते संस्थान हद्दीत वीस फूट घुसलं. रातची वर्दी वाड्यावर धडकली तेव्हा सरकार हुजूर तयार होते फार आमची पण टाळी ब्रह्मानंदी लागली होती. खलबतखान्यात बैठक रंगात आली होती आमची. खलबत चाललं होतं, काय वाटेल ते करा पण लांब-हात्याची मुलगी वाड्यावर आली पाहिजे. प्यारे लांबहाते फार कर्मठ

माणूस. त्यात गैरकारभार दूर व्हावा म्हणून हुजूर डेपुटीकडून मुद्दाम संस्थानच्या उरावर आणून ठेवलेला. बेत साधावा कसा ? अकल गुंग झाली होती. त्यात व्हिस्कीची नशा. त्यात वर्दी धडकली, अँग्रेजीतले रोडकामगार थेट हद्दीत वीस फूट घुसले.— खोदकाम चालू झालं आहे सरकारस्वारीचं वळण किती झालं तरी थोरल्या सरकारांचं; मग रगत दत्तक जाण्याआधी फरासाचं का असेना. श्रीमंत ओरडले, हुसकून लावा साल्यांना ! अन्नदात्याचा हुकूम, देवाज्ञेसमान प्यारे. हा तर भलताच खतरनाक पेच. बोलून चालून अँग्रेजी मुलखातली माणसं. त्यात कळलं की रोड विंजणेर गोरा आहे. आणि आमची शिबंदी नेहमीपरमाणे गाफील. पाचपन्नास माणूस रजेवर; उरलेल्यातलं दहापाच बिमार. काही उरलेलं, थेट बाहेरच्या सिनेमाकंपणीला भाड्यानं दिलेलं. वेळ रातीची, नशेत ! पाचावर धारण बसली. फर्मानाचा अंमल व्हायलाच हवा. लांबहात्याच्या मुलीच्या लफड्यातून सुटका साधण्याचा हाच चान्स होता. मुजरा ठोकून बाहेर पडलो. झोक जात होते पण लोळलो नाही. सापडली ती रायफल उचलली. पागेत घुसून समोर गावलं त्या जनावरावर सवारी भरली—जन्मात घोडं कधी चालवलं नव्हतं, आमचा आपला हत्ती—तो पण सर्कसट्रेण्ड. तशीच घोड्यावर सवारी भरली, लगाम खेचला, लाथ हाणली आणि घोडं उसळलं ते थेट थेट हद्दीकडे धावलं प्यारे—रपेटीचं ग्रौंड त्याच बाजूला होतं ना. जनावराला वळण होतं. मागं बघण्याची सोय नव्हती, पुढं सगळा अंधेर, डोक्यात व्हिस्कीची नशा, हद्दीवर तर पोचलो. मशालीच्या उजेडात रोडची कामे चालू होती ती दिसली. घोडं रुकतं का नाही सवाल होता पण मशालींना बुजून रुकलं, एरवी पलीकडे गेलं होतं.

(जावयाच्या बिऱ्हाडातून हास्याचा कल्लोळ.)

(तिकडे बघत) चूप बे कंबख्त ! तर प्यारे ती कशी तिकडे काम करत होती मजूर माणसं. असेल पन्नास साठ माणूस. उघडंबांड. काळं काळं. सावल्या नाचत होत्या त्यांच्या माळावर—लांब रुंद. आणि त्यांचे मुकादम दोन तीन. आणि तो तसा तिथं—रोडविंजणेर—गोरा. तो गुरगुरला, क्या है ? इधर क्यूं आया तुम ? रात्रीचा वखत. विंजणेरनंही अंमल केलेलाच असणार. त्यात माणूसबळ त्याच्या बाजूला. आपण एकटे. घोडं अनोळखी. पण डरलो नाही प्यारे—ओरडलो—हडॆऽऽरहप्प ! डॅमफूल यू गेट आउट. मुजरा कर ! कुणासमोर जबान लांब चालवतोस सुव्वर ? कोण सेनापती ? दिवाण म्हण ?

मुजरा कर ! मुजरा कर नाहीतर गर्दन उतरवली जाईल हरामजादे, मुजरा—

(बेफामपणे ओरडणाऱ्या, उठून कट्ट्यावर उभ्या काकाच्या हातात एक तान्हे पोर रायफलीसारखे रोखलेले. त्याच वेळी जावयाच्या बिऱ्हाडातून बाहेर आलेली त्या पोराची आई हे पाहून जिवाच्या आकांताने ओरडते. मोठा गलका. भराभरा माणसे धावत येतात. गर्दी जमते. गोंधळ. काकाला भेटलेला एकजण या गोंधळात काढता पाय घेतो. कुणीतरी काकाच्या हातचे पोर ओढून घेते. आया आपापली पोरे उचलून घेतात. पुरुष दमबाजी करू लागतात. कुणीतरी काकाची मानगूट पकडते. कुणी दोन गुद्दे त्याच्या पोटात ठेवून देते. काका वेदनेने वाकलेला. आता गोदू समोर येते. तिचे पोर उचलते. तिच्यामागून तिचा नवरा.)

**गोदू** (काका वेदनेने पोटात मुडपून वाकडा झालेला असतानाच) छान बाबा, छान हो. फार छान. काही शुद्ध ! माणूस आहात का आहात कोण, बाबा, पोरं तुमच्यावर सोपली ती काय उचलून फेकाय करता ? विचार तरी काय होता तुमचा ? तुम्हाला म्हणायचं तरी काय ? राक्षस आहात का कोण ? पोसलं हा गुन्हा झाला होय आमचा ? शरम कुठे गेली तुमची ?

**कोणीतरी** पोलिसमध्ये द्या हरामखोराला—

**दुसरा** पोलिसच आहे तो—वेड्यांच्या इस्पितळात टाकायला हवा त्याला—

**पुरुषी बाई** यानंच धक्का मारलान् मघा मला—

**दोघेतिघे** कुणी ? यानं ? ठोकून काढा लेकाच्याला. ( काका सुन्न ..बधिर. अखेर कुणीतरी कसेबसे इतरांना शांत करून बिऱ्हाडात परतवते. जावई उरतो. तो काकाकडे जाळत्या तुच्छतेने पाहतो. मग तोही आत निघून जातो. एकटा—एकटा काका. त्याचे पाय मनस्वी लटपटताहेत. अजून मुद्रेवर, नजरेत, शरीरात, भांगेची तार—थकवा. भूक. मानसिक गोंधळ.

काळोख.

उजेड.

काका त्याच्या कट्ट्यावरच भितीला टेकून गाढ झोपलेला.

पहाता पहाता प्रकाश योजना बदलते. ड्रमची लय ऐकू येऊ लागते.

त्या लयीत पुढे मानकरी आणि मागोमाग भोई मेण्यासकट येतात. मानकरी गाढ झोपल्या काकाकडे निर्देश करतो. भोई पुढे होतात. काकाला लहान मुलासारखा उचलून मेण्यात ठेवतात. ड्रमच्या लयीतच पुन्हा मेणा उचलतात आणि पुढे मानकरी, मागून मेण्यासकट भोई ड्रमच्या लयीत परत जाऊ लागतात.

काळोख.

उजेड.

ड्रमची लय ऐकू येत नाही.

थकलेला, भांग चढलेला काका कट्ट्यावरच जागच्या जागी बसून झोपलेला. तोंड उघडे. घोरणे. बिऱ्हाडावाटे पंगतीतले श्लोक ऐकू येताहेत. मग " पार्वतीपते हर हर महादेव, हां सुरू करा मंडळी "–)

प ड दा.

★ ★ ★

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ रस्ता, अंधार. बाजूला एका बंद दुकानाची फळी. कुत्र्याचे रडणे लांबून ऐकू येते आहे.

भांगेच्या उतरत्या तारेत, बधिर डोक्याने भल्याकाका पाय ओढीत परत ड्यूटीवर निघाला आहे. अंगावर पोलिसचा युनिफॉर्म. अर्ध्या तुमानीचे खिसे फुगलेले. चालताना काका वारंवार पोलिसी टोपीसकट डोके थापटतो, खिसे चाचपडतो. जागच्या जागीच चालल्याचा अभिनय. (माइम). मधूनच मोटारी जेमतेम चुकवतो. पायाखालचे नीटसे न दिसल्याने हेलपाटतो. कुणाकुणावर टक्करतो. मुद्रा कमालीची बधिर. सवयीनेच काका चालतो आहे. मधूनच मुंडी झाडून बारकाईने इतस्ततः पहाण्याचा प्रयत्न करतो आहे. ]

भल्या ( तोंडाने प्रथम ऐकू न येणारी पुटपुट. मग चक्क स्वगत ) एकखय, दुखय, तिखय आणि चौखय . अकरा, बकरा, आणखिन टोकरा... डावा उजवा...डावा उजवा ...उजवा...उजवा चूक डावा...चुकला ...डावा...नव्हे उजवा...दोन्ही चुकले...सगळंच चुकलंय तिच्या मायला.. पार चुकलंय ... ओ–अरे काय डोळे आहेत का भोकं ? जरा बघून...चुकलो, आमचंच चुकलं. पण बोंबलू नका...जो तो लेकाचा बोंबलतोय...ऐकून कान फुटायची टैम आली...ओ मिष्टर, जरा सामने बघून चाला...ए कुतरड्या, हट बाजू–कुतरडं ते कुतरडं आणिक ऐट हत्तीचा...मारीन एक. घ्या...मारणार होता जिवानिशी. काय जीव वर आला काय हो आमचा, पाव्हणे ? नंबर टिपीन. खेटे

मारावे लागतील कोडतात तेव्हा कळेल...काय नाही कळणार कुणाला ...मगजात थंडाई गेल्येय सर्वांच्या...बंभोले... (एकदम काही तरी जाणवून चालायचा थांबतो. छाती फुगते. गाल रुंदावतात ). दिवाण म्हण सुव्वर, मुजरा कर. कुणासमोर जबान लांब चालवतोस ? मुजरा...( मोठी जांभई येते. पुन्हा पाय ओढीत चालू लागतो) मुजरा...हुजरा...गजरा मोतियाचा गजरा...(पुन्हा थांबतो परेशान होऊन. ) रखमा,...प्यारी...पाय दुखतात, पोटऱ्यांचा निवडुंग झालाय जणू. टाचांच्या ठिकऱ्या झाल्यायत...सांधे बोंब मारतात...मगज शिश्यासारखा जड झालाय ... जागरणात भांग, त्यात भूक...(चालू लागतो.) पंगत बसण्याआधीच आमचा दांडा गुल झाला...तडस लागेपर्यंत जेवले असतील सगळे...आम्ही बेहोश...(थांबतो ) पण तरी सरकारहुजूरनी याद ठेवली, रखमा...मेणा धाडला खास आणि आमच्या संगतीत पंगत केली...दिवाण म्हणून वागवलं नाही, सख्ख्या भावाची ट्रीटमेंट दिली...दिलवाला माणूस ..केल्या सर्व्हिसची कदर आहे...रखमा, प्यारी, पंगतीनंतर हुजुरांच्या महालात पाय चेपायला कोण होतं, आहे ठाऊक ? मालूम है ? है तो बोलो. रखमा, पाय चेपायला तू होतीस. ओहोहो, अजून तुझी सायीची बोटं पायां-वरून फिरतायत, रखमा...तुझं नाक–(एकदम अवसान चढून) हरामजादा पांडू–सुव्वर–(दिवाणाचा अधिकार संचारल्यासारखा) मुजरा कर सुव्वर, दिवाण म्हण...(पण वारा निघून गेल्यासारखा सूर पाडून जांभई दाबीत) मुजरा कर...मुज...रा...(जांभई हाणतो एक.) भोसले–(मोठा आवंढा गिळतो.) माणुसकी नाही साल्याला— पिकल्या केसांची कदर नाही–काळजाच्या जाग्यावर दगड दिलाय ठेवून भोसल्याच्या, हडेरहप्प. मगजात नवसागर जळतोय. मुजरा कर सुव्वर, दिवाण म्हण. दिवाण म्हण...

(पडद्यातून यासरशी दिवाणकीचे पहिल्या अंकाअखेरचे फर्मान काकाला ऐकू येते. बधीर मुद्रेनेच काका ते ऐकतो. त्याची कुडी त्यासरशी ताठरते. पायात जोर येतो. दिवाण भल्या काका चुटकीने काल्पनिक भोसलेला उडवून जागच्या जागी चालू लागतो. चालताना मुजरे घेतल्यासारखा दुतर्फा पाहून वारंवार तोऱ्याने वाकतो. मागे ऐकू येणारे कुत्र्याचे रडणे एकदम शिंग तुताऱ्यात रूपांतरित होते. आता बाजूच्या बंद दुकानाच्या फळीवर, दरबारात आसनस्थ व्हावे तसा तोऱ्यात काका बसतो. मूर्तिमंत दिवाण, फक्त पोषाख कॉन्स्टेबलचा

आणि दरबाराऐवजी ओकीबोकी सडक. कुत्र्याचे रडणे आणि शिंगाचे आवाज एकातून एक वाजत रहातात.

आसनस्थ काका मधून मधून माना हलवतो आहे, पिढीजात दिवाणाच्या वजनाने. इतस्ततः कटाक्ष टाकतो आहे. विचार केल्यासारखा दाखवतो आहे. सारे दिवाणाचे. तसे अस्सल भारदस्त. मागे भरल्या दरबारमधली कुजबूज ऐकू येऊ लागते. खूप मानकरी जणू एकत्र जमून खलबते करताहेत. यातून एकदम लांब कुठे तरी जमावाचा ओरडा होतो, वाढतो. स्टेजवर बॅटऱ्यांचे झोत उलट सुलट नाचू लागतात.

'धरा–मारा–तो तिकडून–त्या तिकडे'–असे काही ऐकू येऊ लागते लांबून. बधीर काकाचा गोंधळ होऊ लागतो. तो हाताने ते सारे झाडू पहातो, आपले दिवाणपण शाबूत राखीत. पण ओरडा वाढतोच आणि कशाबशा उठून उभ्या राहिलेल्या काकाच्या अंगावर चोर वेगाने येऊन आदळतो. हेलपाटलेला काका कसावसाच त्याला धरतो. सोडीत नाही.)

**चोर** सोडा–सोडा मला–सोडा—

**भल्या** हडेरहप्प. कौन है बे तू ?

**चोर** सोडा म्हणतो ना—

(आणि एक प्रकाशझोत स्टेजवर येतो. क्षणमात्र स्थिरावतो. त्यात दोघेही एकमेकांना दिसतात. चोराच्या मुद्रेवर रक्त. भय.)

**भल्या** कोण बे तू ?

**चोर** तुम्ही !

**भल्या** क्या है फिर...क्या हुआ...गडबड काय आहे...

**चोर** कर्मांची गडबड. सोडा मला–आलेच ते जवळ–सोडा–सोडा.

(पड्द्यात पुन्हा जमावाचा ओरडा वाढतो. 'चोर–चोर'...)

**भल्या** (बधीरपणेच त्याला पकडून ठेवीत) आखिर हुआ है क्या ? क्या है ये...

**चोर** व्हायचं काय ? व्हायचं तेच झालंय पुन्हा...मला सोडा म्हणतो ना... मी खून करीन तुमचा...सुरा काढीन...सुरा फार अणकुचीदार आहे माझा, फार भयंकर माणूस आहे मी...सोडा मला—

**भल्या** हडेरहप्प. झालंय काय पहिले बताव. कोण तू ? कुठं आहोत आपण ? रुख बे. धावतोस कुठं ? रखमा किधर है ?

**चोर** कसली रखमा. मी कुठं आहे तेच मला माहीत नाही. सोडा आधी नाही तर ते मला आणखी मारणार.

**भल्या** मारणार ? कोण मारणार ? भर दरबारमध्ये घोड्यासारखा दौडत येतोस, शरम नाही वाटत कंबख्त ? फटके मिळतील. सीधा जबाब कर. कोण तू ? कसा आलास ? गडबड काय आहे ? मालूम है कौन है इधर ? दिवाणबहादुर ष्टेट ऑफ बुंदवाड, दख्खन. (काका तसा उभा.)

**चोर** (कपाळावर हात मारून) वाट लागली. सेनापतीचे दिवाण झालात का तुम्ही आता. पण मला सोडा—

**भल्या** नहीं, पैले बताव, तू कौन ?

**चोर** अहो–मी–जाऊ दे, सांगण्यात काय अर्थ आता. म्हणा चोरच. पण मला आधी—

**भल्या** चेहऱ्यावर रगत दिसतंय तुझ्या...

**चोर** ही भोसल्याची कर्तुक. त्यात आणखी लोकांची भर. आता जास्त नकोय मला. सोडाच तुम्ही मला सेनापतीसाहेब–हवं तर दिवाणसाहेब–पण सोडा–सोडा आधी–(धडपडत रहातो.)

(आतला ओरडा वाढतो, मग लांब जातो.)

गेले ते ? आले नाहीत ? बचावलो. (काकाच्या हातातच मूर्च्छित पडल्यासारखा गळतो.)

**भल्या** हडेरहप्प. ऊठ बे. सिध्धा हो. झालं काय तुला ? कोण भोस... (कळते कोण ते.) चोर, तू काल रातचाच–

**चोर** (सरळ उभा रहाण्याचा प्रयत्न करीत) हो. (पुन्हा लटपटतो.)

**भल्या** अच्छा भूक लागली आहे बे तुला. मग बोल की असं कंबख्त.

**चोर** कालपासून पोटात काही नाही—

**भल्या** ठीक है. बैठ जाव इधर. घे. (अर्ध्या तुमानीच्या खिशातून एक जिलबी काढून चोराला देतो.) लेव.

**चोर** (उजळून) जिलबी. उपकार झाले–(घेऊन तात्काळ हजम करीत) असं आहे. आता इतक्यात प्राणाचा भरोसा नव्हता नि आता जिलबी मिळते. एकच जिलबी ?

**भल्या** (खिशातून आणखी एक देत) लेव. और लेव. पण जादा नाही मिळणार.

**चोर** (तीही रुची घेत घाईने हजम करून) उपकार तुमचे. जिलब्या जरा कमतीच गोड झाल्यात. आणि थंड पण.

(कुठून तरी कुत्र्याचे विव्हळणे.)

**भल्या** तुझ्या बानं पैसे मोजलेत काय बे. नाव ठेवतोस ती ?

**चोर** आणखी एक जाईल. खपेल म्हणतोय.

**भल्या** (आणखी एक देत) अब जादा एक तुकडा पण नाही मिळणार, सांगून ठेवतोय, नालायक. हडेरहप्प ! चोर ते चोर आणि मागून जिलब्या खातंय.

**चोर** आता जास्त मागण्याची सोय नाहीच म्हणा. पण एकादी हातात आली तर खाल्ली जाईल.

**भल्या** खाल्ली जाईल ? हडेरहप्प. जिलब्या काय तुझ्यासाठी चोरल्या बे मी माझ्या पोरीच्या घरी ?

**चोर** काय म्हणालात ? चोरल्या ?

**भल्या** बिलकुल. जिलबीची खाली एक चौकडी वाढली होतीन कार्टीनं पानात. संपल्या म्हणाली कार्टी. आम्ही भांगेतून होषमधी येईस्तोवर स्वतः जेवून मोकळीसुद्धा झाली होती. आणि तो-तो नालायक अपचनाचे ढेकर देत पोट फुगवून पडला होता बाहेरच्या खोलीत. काय करणार, आपल्या पोटात निभेना. पुढ्यातलं ताट रिकामं करून कोपऱ्यात पाहिलं. तिथं ठेवलं होतं, वाढून भंग्याचं. सात जिलब्या, भात वरण, पापड, मठ्ठयाची वाटी. सब कम्प्लीट. गोदी पण नव्हती जवळपास. येणार नव्हती तेवढ्यात. तो फिर उठा, हलकेसे आगे बढा, वरणभात जल्द खतम किया, मठ्ठा पी लिया और जिलेब्या-खिशात भरल्या. पापड ठेवला-म्हणालो तेवढा भंग्याला होईल, असू दे. ताट झाकून ठेवलं पहिल्यासारखं आणि ड्यूटीवर निघालो. चोर, फर्स्टकलास चोरी, तिच्या मायला. लेव, और लेव प्यारे. (चोराला आणखी एक जिलबी काढून देतो. चोर ती घाईने तोंडात भरतो.)

(कुठे तरी कुत्र्याचे विव्हळणे.)

अर्धपोटी ठेवते कार्टी म्हाताऱ्या बापाला. अबे क्या इन्साफ है क्या ये ? आम्हाला एक चौकडी आणि भंग्याला सात ? हडेरहप्प.

**चोर** आता मात्र पुरे.

**भल्या** ( खिसे चाचपून ) क्या बकवास. चोर, तूच सगळ्या जिलब्या हजम केल्यास ? खतम सबके सब.

**चोर** ( तोंड निपटीत ) दिल्यात तेवढ्याच खाल्ल्या. बाकी आता कसं हुशार वाटलं. तरतरी आली. ( अंतर्मुख होऊन ) पुन्हा सहज एक निभेल–चोरी. काय माझे हाल. सकाळी कोर्टात उभं केलं मला. मॅजिस्ट्रेट भला निघाला, त्यानं पोलिसाला शिव्या घातल्या, मला मारलं म्हणून. त्यात एका जंटलमननं जामिनावर सोडवलं. गुन्हेगारांना सरळ मार्गाला लावण्याचा धंदा करतो वाटतं तो. माझा अवतार बघून त्याला दया आली. सुटलो. पण पुढे काय करायचं, काही समजेना. आणि पुन्हा चोरी केली.

**भल्या** हुडेरहप्प.

**चोर** पण आजची जमली नाही. मुद्देमाल टाकून जान बचवायला धावावं लागलं. छ्याः ! अजून छाती ससासारखी उडतेय. बाकी, लोकांच्या हातनं तुमच्यामुळं एवढी खेप सुटलो, वर जिलब्या मिळाल्या. नशीब सध्या भलतं तेज दिसतंय. फिगर लावायला हवा.

**भल्या** हरामजादे, रातची आज गेटावर माझी आली पंचाईत ? कुत्र्याची बिस्कुटंसुद्धा जवळपास गावण्याची वानवा. त्यात दिवसाचं जागरण, भांग. डोकं परतुन जड व्हायला लागलं. ( जांभई दावीत ) चल बे–किधर जायेंगे हम ?

**चोर** ते मला कशाला विचारताय ? न्या, गेटवर न्या. परतुन चोरी करण्याची सणक तरी यायला नको मग. काय नेम, या खेपेला जमावाच्या हातनं ठेचून मरेनसुद्धा उंदीरघुशीसारखा. त्यापेक्षा भोसले परवडला. जान तरी राहील. न्या.

**भल्या** क्या कहा...भोसले ?

**चोर** हो. भोसले सब इनसपेट्टर. तो, तुमच्या गेटावरचा हैवान.

**भल्या** ( लक्षात येत ) हुडेर...हप्प....चोर...

**चोर** काय दिवाणसाहेब, का सेनापतीसाहेब पुरे ?

**भल्या** (मुंडी झाडून स्वच्छ विचार करण्याचा प्रयत्न करीत) दिवाण राह्यला झालनात...गडबड आहे काही तरी. (डोक्यावर तर्जनी

ऑपटून निर्देश करतो.) चल, रात काय झाली, इथंच टैम काढीत काय राह्यलो—

(दोघे जातात. चोर लंगडत पुढे; पाय ओढीत थकला, बधीर काका मागून. कुठे तरी कुत्र्याचे विव्हळणे थांबथांबून ऐकू येत रहाते. मध्येच काका चोराला अडवतो आता स्वत: पाय ओढीत पुढे चालत जातो. मागून लंगडत चोर. कुत्र्याचे विव्हळणे चालू.

तर्र झालेला सब इन्स्पेक्टर भोसले रंगमंचावर येतो. पहाता क्षणीच बेहोश वाटावा.)

भोसले (जड, तारवटल्या सुरात) हम पीके आये है. बाईची जात तेवढी हराम. शूट केली पाह्यजे. डुक्कर साली.

(कुत्रे विव्हळतेच आहे कुठे तरी.)

कुत्री साली. (कमरेचे रिव्हॉल्व्हर चाचपडत काढतो.) शूट केली पाह्यजे—शूट—केली पाह्यजे...(कुत्रे अस्पष्ट विव्हळतेच आहे. रिव्हॉल्व्हर भोसलेच्या हातात. अंदाजाने इतस्तत: पाहण्याचा तर्र नजरेने प्रयत्न करीत) चूप.

(कुत्रे विव्हळतच रहाते.)

चूप हरामजादे...दगाबाज. विश्वासघातकी. कुत्री !

(कुत्रे विव्हळतच रहाते.)

चूप ! (रिव्हॉल्व्हर झाडतो. कुत्र्याचे विव्हळणे बंद. शांतता.) खतम् साली. (भेसूर हसतो.) हम पीके आये है. ( तोल सावरीत हातच्या रिव्हॉल्व्हरसकट निघून जातो.
काळोख.)

★ ★ ★

## प्रवेश दुसरा

(चौकी, रात्र, रस्त्यावरच्या म्युनिसिपल दिव्याचा उजेड. चौकीत एक कॉन्स्टेबल 'माथ्यावरी चंद्र की ग ढळला' कंटाळल्या सुरात गुणगुणत बिडी फुंकीत बसला आहे. काका आणि मागून चोर येऊन पोचतात.)

**कॉन्स्टे.** या सेनापतीसाहेब.

**भल्या** (यासरशी एकदम पिसाळत) कोण सेनापती ? सुव्वर, दिवाण म्हण.
(कॉन्स्टेबल हडबडलेला. थरथर कापतो.)
दिवाणबहादुर ष्टेट ऑफ बुंदवाड, दख्खन. (झुबकेदार मिशांवरून हात फिरवतो.) पण शिबंदी कामगारकीची शान नाही. लेट झाला. हा कुठं गेला–(शोधून) हा शेर गावला वाटेत. शेर नाही, चोर.
(कडाडून जांभई देतो.)

**कॉन्स्टे.** तुम्ही ऱ्हा शेरअच्छेर नवटाक करत आणि आम्ही बसतो चुना घासत. ड्टीचा टैम सरून घंटा उलथला.

**भल्या** (गेटात शिरत) चोर, बैठ बे. क्या कटकट खालीपिली...

**कॉन्स्टे.** कटकट ? आम्ही कटकट करतो काय ?

**भल्या** (एकदम) चूप. कुणापुढे जबान लांब चालवतोस, सुव्वर ?
(दिवाणाच्या वजनाने उभा.)

**कॉन्स्टे.** (आवाज पाडून) कनिष्टेबल ते कनिष्टेबल आणिक रुबाब—

**भल्या** दिवाणबहादुर भलोजी त्रिंबक कुळकर्णी, रिटायर शिबंदी कामगार, बकल नंबर दोनशे अठरा. मुजरा करो. (कॉन्स्टेबल तसाच उभा.) मुजरा करो. मु–ज–रा ! (अवतार भलताच उग्र. पाय लटलट कापताहेत.)

**कॉन्स्टे.** (कसाबसा मुजरा केल्यासारखा करीत) लकच्च झक मारू आमचं म्हणून ह्या गेटावर आलो...

**भल्या** जाव. फिरून असला बा–आदब बा–मुलाहिजा बर्ताव खपणार नाही सांगून ठेवतोय.

**कॉन्स्टे.** (आपल्या टोपीं, वहाणां वगैरे वस्तू गोळा करून चाव्या कांकाकडे टेबलावर फेकत) या चाव्या. ती तिथं ठेसन डायरी—बघुन घ्या न् चारज घेऊन मोकळं करा आमाला.

**भल्या** हुडेरहप्प. चले जाव बोला ना हम. चले जाव.

(कॉन्स्टेबल चौकीबाहेर येतो.)

**कॉन्स्टे.** आटा ढिला झाल्यागत दिसतोय म्हाताऱ्याचा...(न रहावयून) सावचित असा. रात हाय. भोसलेसाहेब बी हायती...

**भल्या** (ताड्दिशी) अबे जाव कंबख्त. दिवाणबहादुर बुंदवाड दख्खन है इधर. दोनशे अठरा बकल नंबर. आमच्या अंडर सगळा कारोभार चालतो इथं. पहिले श्रीमंत हुजूर, नंबर दोन हम. बाकी सब हमसे कम. शिबंदी कामगार की बात अलग.

(कॉन्स्टेबल निघून गेलेला. भांगेच्या उतरत्या तारेत काका आता उसासून टेबलाशी येऊन खुर्चीत स्वतःला घालून घेतो. चोर पलीकडे उभा.)

( बसत, वयाच्या सहाजिकपणे ) अयाई. . रखमा, प्यारी, पाय दुखतात ..(बसून अंगभरची वेदना एकदा भोगून जणू बाजूला टाकतो. पुन्हा कुडीत प्रशस्तपणा येतो. कंदील मोठा करतो. रंगमंचावर प्रकाश उजळू लागलेला. चौकीला एखाद्या ऐतिहासिक वाड्याची कळा या प्रकाशात भासते आहे. तारवटल्या डोळ्यांनी कुठे तरी पहात) कोण आहे तिकडे ?

**चोर** मीच—चोर.

**भल्या** हुडेरहप्प...कायकू इधर आया हैवान ? चोऱ्या दरवडे तिकडे अंग्रेजी हद्दीत. इथे स्टेटमध्ये सब आलबेल मंगता है. फटके मिळतील.

**चोर** ते कालधरनं मिळतातच आहेत. एकदाचा लाकपमध्ये टाका आता म्हणजे झालं. आता आजच्या रातीत त्या भोसल्याच्या हातनं कसातरी सुटायला हवा...घ्या, गुन्हा घ्या नोंदवून-चला—

**भल्या** काय का गुन्हा ?

**चोर** चोरीचाच. चला—

**भल्या** कोण आहे तिकडे ?

**चोर** तिकडेबिकडे कोण नाही, आहोत तुम्ही न् मी. होषमधी या काका, गेट आहे हे गेट, पोलिस गेट. तुम्ही ड्यूटीवर आहात. रात हाय.

मला चोरी करून पळताना पकडलंय तुम्ही–म्हणजे तेच, मीच गावलो. पण तुम्ही धरून ठेवलंत—केस घ्या नोंद करून आणिक लाकपमध्ये भरा एकदाचा—जरा तेवढीच झोप तरी गावेल—पार चेचा झालाय अंगाचा—

**भल्या** ( धूसर, मूढ नजरेनं भोवताली बघण्याचा प्रयत्न करीत ) गेट ..?. क्या बकवास...

(प्रकाश वाढून रंगमंचावरची चौकी थेट एखाद्या जुन्या वाड्या-सारखीच दिसू लागली आहे.)

**चोर** हां, गेटच तर काय.

**भल्या** ( पुन:पुन्हा सर्वभर पहात ) क्या बकवास—

**चोर** बकवास नाही काका, देवा शप्पथ. कनिष्टेबल आहात तुम्ही–गपा—उगा ओरडू नका वाघागत – दिवाण म्हण म्हणून. दिवाण म्हणतो मी, वाट्टेल ते म्हणतो, पण आधी आमचं एवढं लफडं मिटवा—ते रजिष्टर–तो–लाकप–हा मी. चला–उठा—

**भल्या** ( जे दिसते ते नि चोर बोलतो ते यातल्या तफावतीने आवंढे गिळीत ) आखिर मामला है क्या...?

**चोर** ( कानात ओरडत ) मामला खतरनाक आहे, तुम्ही होषमधी आला नाहीत तर...

**भल्या** ओरडू नको बे–भैरे नाहीत आम्ही. लेव वो रष्टर—नही, रजिष्टर–लेव. भर काय ते त्यामधी. नाव–पता–कंप्लेण्ट–टाइम–ये लेव चावी–लेव–लाकपची आहे–धे–खोल...बैठ जावून आत...बैठ...काय आहे कळेना...

**चोर** मीच करू सगळं ? माझं मीच ? काका हे मात्र फार होतंय. मीच रजिष्टर भरून लाकप खोलायचं ? मग पोलिसच का नाही झालो मी ! चोर का झालो ? माझं काम मी केलंय काका, आता तुमचं तुम्ही करायला हवं. चला बरं.

**भल्या** हडेरहप्प. ( जांभई येते कडाडून. ती देत कोपऱ्यात पहातो. ).

( कोपऱ्यात एक हुजऱ्या उभा. काका दुसऱ्या कोपऱ्यात पहातो तिथे दुसरा हुजऱ्या उभा. काका डोळे फाडून पहात रहातो. आता चौकीबाहेरून चाळांचा आवाज पावले पडावीत तसा

ऐकू येऊ लागतो. तो आवाज संथपणे चौकीत येतो. स्त्रीचा आवाज. : दिवाणसाहेब हायती काय रे वर ?

हुजऱ्याचा होकार.

चाळांचा आवाज पुन्हा सुरू होऊन जिन्याने वर जातो. कुणी दिसत मात्र नाही. लटपटत्या पायांनी काका भारल्या अनिमिषपणे त्या वर वर जाणाऱ्या आवाजाच्या दिशेने पुढे होतो.)

**भल्या** रखमा...प्यारी...इधर है ना हम...

(चाळ जिन्यावर पोचून ऐकू येईनासे होतात.)

प्यारी...रखमा...

**चोर** झाली सुरू तुमची प्यारी रखमा...

**भल्या** चूब बे. .नाकावर पदर होता तिचा. .पण बाकी इमारत तशीच मजबूत..

(आता जिन्यावरून संस्थानी वेषातले दोघेजण ऐकू न येणारे काहीतरी कुजबुजत उतरू लागतात.)

हा कोण ? जमादार तात्या ऐरेकर...

(ते दोघे तसेच ऐकू न येणारे कुजबुजत चौकीबाहेर निघून जातात.)

शंकाच नको, तात्या ऐरेकरच तो. बरोबर रंगा रामचंद्र सातपुते. कट शिजतोय, कट, पाताळधुंड्यांचा. काय गडबड आहे, समजत नाही. पण पता काढला पाहिजे.

**चोर** काका, आधी आमची तेवढी केस—

**भल्या** खामोष. संस्थानमधी कटकारस्थानांना ऊत आलाय आणि हजामतीच्या गोष्टी करतोस, कंबख्त ! आता आधी कटवाल्यांची हजामत, मग आमची.

**चोर** आमची नक्कीच आता. . .पार गळ्यापासून. दिवाणसाहेब, अजून रात्र नाही चढली तर एवढ्यामध्येच तुमची ही अशी गत ? छे. छे... आज चिन्हं बरं दिसत नाही.

**भल्या** डोळ्यात तेल घालून सख्त नजर राखली पाह्यजे. कोण आहे रे तिकडे ?

**चोर** मीच आहे, चोर. आणखी कोण येणार अशा वखताला इथं ? नाहीतर तो भोसले. ( कल्पनेनेच शहारून ) अग आई ग.

( भल्याकाका हुजरे उभे दिसले तिकडे पहातो आळीपाळीने डोळे विस्फारून. तिथे कुणीही नाही. )

**भल्या** हरामजादे एवढ्यात होते तर मेले कुठं लागलीच ? काही समजेना झालंय. डोकं पार गच्च झालंय, दगडासारखं . डोळ्यांना झापडं चढल्यागत झालीत. बडी झोप लोटते आहे. आणि खडखडीत जाग आल्यागत पण वाटतंय तिच्या मायला—झोपच नाही येत—चोर.

**चोर** ( एकदम येऊन झटत ) ओ. आलात का होषमधी ? बरं झालं. बोला काय ते. लौकर बोला. आता परतुन औट नका होऊ— आईची आण आहे तुम्हाला—आधी केस नोंदवून मुल्या लाकपमधी भरा न् मग खुशाल बसा संस्थान बघत. चला—

**भल्या** ( कोपरे न्यहाळीत, बधीर मुद्रेने ) तिथं काय दिसतंय तुला ?

**चोर** कुठे ? कायसुद्धा नाही.

**भल्या** मघा आवाज ऐकलास बे ?

**चोर** हां. तुमचा तर ऐकतोच आहे–

**भल्या** तो नव्हे कंबख्त, पैंजणांचा आवाज.

**चोर** पोलिस गेटावर ?

**भल्या** कायका पो. . . ( काहीशी शुद्ध येत ) चोर. ( आधारासाठी त्याला धरीत ) मामला बहुत बुरा है शायद. . .

**चोर** कसं बोललात. ( टाळी मागण्यासाठी हात पुढे करीत ) तेच तर म्हणतोय मी.

( स्टेजवर मद्याच्या बाटल्या आणि ग्लास घेऊन दोन संस्थानी नोकर जिन्याने वर जाऊ लागतात. )

**भल्या** ( ताठ होत, नाकपुड्या फुलवून ) हुडेरहप्प. व्हाइट हार्स रेड लेबल. ( ओढल्यासारखा जिन्याकडे जातो, चांगला दोन तीन पायऱ्या वर जातो. )

( नोकर जिना चढून दिसेनासे झालेले. )

**चोर** काका, वर कोण नाही. वर कुठं जाताय ? हार्स नाही न् जाकी नाही, या–खालती या. तो भोसल्या एवढ्यात नाही उपटला म्हणजे

मिळवली. नाहीतर संपला कारभार. काका, आज कसला अंमल केलाय तुम्ही ! काय आहे काय हे ? आटा ढिला पडल्यागतच करू लागलाय तुम्ही–काका–ओ काका–

**भल्या** ( जिन्याच्या पायरीवरच सुन्न उभा. ) व्हाइट हार्स रेड लेबल बघितली नाहीस बे तू आता ! अबे अशी वर तर नेली...अशी...बघून जळजळ सुटली घशात तिच्या मायला...

**चोर** या, खाली या. गेटावर तसलं काय दिसलं तर सप्नातच दिसायचं न् तुम्हाला जागेपणीच दिसू लागलं ! (त्याला बळेच धरून खाली आणीत ) या. बसा हितं. प्या, पाणी प्या हे. व्हाईट हार्स हाय एकदम. प्या. डोळ्यांना पण लावा–( स्वत: काकाच्या टाळूवर त्यातलेच काही थापतो. ) व्हा, हुशार व्हा जरा. चाकरी करायची हाय ना तुम्हाला अजून पोलिसमध्ये ? पेणसल हवी ना ? मी जिता रहावा असं वाटतं ना तुम्हाला ? मग जागे व्हा न् पहिले मला लाकपमध्ये भरा. आधी तेवढी केस नोंद करा.

( काकाचे डोके पाण्याने निथळते आहे. मुद्रा बधीरच. )

**भल्या** (तसाच उठत) चल बे–( त्याला लॉकपकडे नेऊ लागतो. ) कहां है वो बेवकुफ लाकप तिच्या मायला...

**चोर** पण केस नोंद करायची त्याचं काय ?

**भल्या** हडेरहप्प. चूप रहो हैवान. (त्याला नेऊन कसाबसा लॉकपमध्ये भरतो दार कसेबसेच लावून घेतो.)

**चोर** (लॉकपमधून) पण काका केस नोंदवायचं रहालंय––

**भल्या** (पाय ओढीत खुर्चीकडे येऊन खुर्चीत बसत) रहने दो, प्यारे. दीमाग एकदम तेज हो रहा है हमारा...आणिक नींद पण येतेय दावजोर... ( खुर्चीत स्वत:ला लकटून देतो. बसून झोपण्याची पोज घेतो. एका पंजात गालफड विसावलेले. ) झोप गुमान...( पण काकाचे डोळे सताड उघडे ).

(सगळ्या गेटाला आता जुनाट ऐतिहासिक वाड्याचीच अद्‌भुत कळा आलेली. मद्याची बाटली, सोड्याच्या बाटल्या फोडल्याचे, मद्य ग्लासा तबदबद ओतल्याचे खळबळते ओले आवाज काकाला ऐकू येऊ लागतात. येतच रहातात. काका बेचैन. डोळे सताड खुले. मग कुठे तरी मोठ्या पंगतीतली

'पुंडलीक वरदा'ची सामुदायिक ललकारी ऐकू येते. टाट वाटयांचे आवाज. पंगतीतल्या आवाजांचा घुमारा. 'लाडू वाढा लाडू–बासुंदी नंबरी आहे–घ्या हो, आणखी घ्या वाटीभर पंचवीस–सव्वीस–ओय्या–ओता आणखी'चे उद्‌गार. त्यातच दीर्घ, करपट ढेकर ऐकू येतात.

काका सताड उघडया डोळयांनी हेही बसून ऐकतो आहे. त्याला वाढता त्रास होतो आहे. त्यानंतर नृत्याची छुमछुम चालू होते. तबला सारंगी झडू लागते. किरटया आवाजात एक उत्तान लावणी म्हटली जाऊ लागते. मधून मधून पुरुषी दाद. काका जणू गाण्याच्या रंगल्या मैफलीतच बसला आहे. काका कासाविस. भयंकर बेचैन.

आणि चौकीच्या पायरीवर आदल्या रात्रीची बाई. तोंडावर पदर धरलेला. स्वतःच्या भुतासारखी भासते.)

**बाई** काका–

(काकाला दाद पत्ता नाही. तो मैफलीत.)

काका–

(हे हाताने कानापासून झटकून पुन्हा मैफलीतच रहाण्याचा प्रयत्न करतो.)

काका वं–मी हाय काका–मी–काल रातीचीच–

(सगळे आवाज पहाता पहाता मागे जातात. अस्पष्ट होतात. आणि लुप्त होतात.)

**भल्या** (डोळे ताणून) कोण ? (उभ्या बाईकडे जड डोळयांनी पहाण्याचा प्रयत्न करीत कसाबसा जागचा उठू बघत) रखमा ? रखमा प्यारी, तू ? (विव्हळत पुन्हा बसता होत) अगाई...कंबर पार मोडून गेली, रखमा. सांधे बोंब मारायला लावतात. आता नाही साहवत. (कण्हत रहातो.)

**बाई** (अगदी सहज जाणवलेल्या कळवळयाने) पाय चेपू का, काका ?

**भल्या** हां, आव प्यारी. अंदर आव.

(ती बिचकतच चौकीत येते.)

जवळ ये, रखमा. रखमा, मालूम पडा तुमकू ?

**बाई** काय, काका ?

**भल्या** प्यारी, आम्ही दिवाणबहादुर झालो. दिवाणबहादुर, स्टेट आफ बुंदवाड, दख्खन. (कुडीत तो रुबाब क्षणभर येतो.) हुजूरांची कृपा झाली, कल्याण केलं. रखमा, पण ती शान नाही. शिबंदी कामगारकीची चव यात नाही. वो जमाना तो गुजर चुका. पाय चेप, रखमा...

**बाई** (पाय चेपीत) काका ..येक सांगी हाय पायाशी, काका...

**चोर** (लॉकपमधून हलक्या आवाजात) अे...अे बाई—

**भल्या** जरा आराम लगता है अब, क्या है रखमा, प्यारी ? बोल तू. आम्ही म्हणू ते आता केलं जाईल. दिवाणबहादुर कुळकर्णी. रिटायर शिबंदी कामगार.

**चोर** शुत्–ए–ए बाई–

**भल्या** काय रं ? काल रातीचाच नव्हं तू ?

**चोर** होय होय. म्हाताऱ्याला जागा राख. दिमाग औट व्हायला लागलाय म्हाताऱ्याचा. बाराच्या भावात जाईल, तो पण नि मी पण.

**भल्या** प्यारी, बोल क्या चाहती है ?

**बाई** काका तुमी दयाळू हात. गरिबाचं वाली हात. दिल येवाचं हाय तुमचं, काका–काल राती मी गेली पळून–मी घाबरली–मला न्हाई न्हावलं– तुमाला सांगतल्याबिगर गेली–

**भल्या** तो पांडू तुझा नवरा–हैवान ! त्यानं नाकाचा लचका तोडला तुझ्या प्यारी, त्याला तू काय करणार ? मी तरी काय करणार ? काय फसकलास नाक, त्याचं काय केलं हरामजाद्यानं...काय रगत वहात होतं रखमा, काय रगत . ओः––

**बाई** रखमा न्हाई मी काका–मी रुकमनी–रुकमनी मी...काल् राती आली होती हितं—

**भल्या** आता नाक कसं आहे तुझं रखमा ? (कसाबसा तिच्या नाकावरचा पदर बळेच बाजूला करून डोळे ताणून धूसरपणे पहातो.) रखमा, प्यारी ..नवं नाक आलं तुला, आं ? क्या बात. श्रीमंत हुजूरांची कृपा...सब ठीक किया हुजूरने ..रखमा आम्ही दिवाणबहादुर झालो, तुला नवं नाक आलं. सरकारहुजूर कृपावंत झाले...

**बाई** माझं नाक...काय पण झालं न्हवतं त्येला, धनी–काय पण झालं न्हवतं...

भल्या पाय चेप, रखमा. ( ती चेपू लागते पुन्हा. ) अब बहुत आराम लगता है. पायात आराम पण डोक्यात आग आहे. त्या दिवशी काही पण करू शकलो नाही रखमा, पांडोबानं हरामखोरानं तुझं चाफेकळी नाक पेचलं, दातानं–ऊस पेचावा तसं–आणि तू ओरडत, चिल्ला करीत आमच्या सामने आलीस–ते रगत रखमा, ओः...ते रगत...ते बघून काय पण करू शकलो नाही...काय पण नाही...( तळमळतो आणि एकदम दिवाणाचा रुबाब घेतो. ) रखमा, अब उसका बदला लिया जायगा. ( प्रशस्त बसतो. डोळ्यात वाढता भ्रमिष्टपणा. ) कोण आहे तिकडे ?

चोर ( हलकेच, लॉकपमधून ) बाई, म्हाताऱ्याला सोडू नको–आजची रात साधी नाही दिसत. तो भोसल्या राक्षस...

भल्या ( खवळून ) कोण आहे तिकडे ? सबके सब नौकर क्या भाड में गये क्या ? राम्या, हणम्या, बाळ्या, कृष्ण्या—

( भरभरा कुठून तरी हे संस्थानी चाकर कोपऱ्यात जमतात मुजरे करीत. )

( त्यांना डोळे फाडून पहात ) हरामजाद्यांनो, आमचं अन्न खाता ते ते काय गंजिफा पिटण्यासाठी ? टैमावर उगवत नाही एकजण. उलटे टांगून मिरचीची धुणी मिळेल. आताच्या आता कचेरीत जा आणि बाविसकर कारकुनाला म्हणावं श्रीमंतांच्या सही शिक्क्यासकट एक फर्मान काढा–पांडोबा चिताऱ्याला दोनशे फटके मारून मरेपर्यन्त फाशी दिली आहे ! पाठीची चामडी लोळली पाहिजे, रव्वा हात जीभ बाहेर पडली पाहिजे. जाव्—

( सगळे आले तसे जातात. )

अब ठीक हुआ

बाई ( लॉकपमधल्या चोराला ) काय हाय रे ह्ये ? हितं तर कौन न्हाय-

चोर असंच आहे. दांडा गुल होतोय म्हाताऱ्याचा.

बाई ( काकाला हलवीत ) धनी, होषमधी या धनी—

भल्या हां, रखमा, रममधला घोटा जरा ज्यादा झाला...

बाई ( पाय चेपीत ) मी सांगितलं न्हाई धनी राती तुमाला...लपवून ठयेवलं पर त्ये पोर माजं हुतं धनी, माजं हुतं—

भल्या क्या बकवास.

बाई — हां धनी, त्ये पोर – हितं आल्यालं––माझं हुतं–धंदेवाली बाई हाय मी–त्येला सडकंवर सोडून प्वाट जाळती...

भल्या — घोडेसवारी मैदानच्या कोपऱ्यावर त्या दिवशी चिरगुटात गुंडाळून ठेवलेलं ते तान्हं पोर-अरे हमकू क्या मालूम ! वर्दी लागताच पंचनामा करवला आणि पोर चर्चमध्ये धाडलं–पोरं बाटवून सांभाळतात तिथं—

बाई — न्हाई धनी, न्हाई, त्ये न्हवं...

भल्य — पोरगा होता ना तो.. गुटगुटीत...पाह्यल्या क्षणी ध्यानात आलं का पोरगा कुणा घरंदाज रक्ताचा आहे...

बाई — अनाथगिरात गुदरलं तुमी ते, धनी – माजं प्वार आज सकाळला अनाथगिरात गुदरलं तुमी–पण माजं हाय त्ये–मी वळख दीन, खुणा पटवीन...मला द्या ते धनी, मला द्या–माजं प्वार मला द्या... दिल तुटतोय तटातट...

भल्या — हडेरहप्प...रखमा, तो पोर तुझा होता ! म्हणजे प्यारी, तो पोर आपला होता.. कुणास ठाऊक बाटून कुठं गेला, काय झाला...असता तर आधार झाला असता...औरस पोरटी बेईमान झाली, अनौरस पोरटा तरी आपला राह्यला असता...वारस केला असता त्याला...हट् लौंडी, नालायक कहींकी. तू पैले कायकू नही बोली ?

बाई — चुकी झाली, धनी, चुकी झाली–पर माफी करा धनी, माझा कलेजा मला वापस द्या–

भल्य — (दिवाणाचा रुबाब. भ्रमिष्ट डोळे) ठीक है. कोण आहे तिकडे ?

बाई — (हबकत) अगो बया.

(कोपऱ्यात एक हसतमुख सुदृढ तरुण कुठून तरी येऊन समोर उभा.)

भल्य — (डोळे फाडून पहात। कौन है तुम ? हडेरहप्प...क्या बोला...परतुन बोल...परतुन.. परतुन...ओहोहो, दिल खुश हुआ बेटे, दिमाग थंडा हुआ. रखमा लौंडी, श्रीमंत सरकारहुजूरांच्या कृपेने आपला बेटा देखील आपल्याला वापस मिळाला, तो बघ !

बा: — (तिकडे घाबऱ्या घाबऱ्या पहात) धनी, कोण न्हाई धनी, असं काय करतायसा धनी––

भल्य — तो बघ प्यारी. तो बघ. दिसत नाही तुला ? कितना मासूम है. बिलकुल

तुझ्यासारखं कळीदार सरळ नाक आणि माझ्यासारखी तबियत ओहोहो...

(तो कोपऱ्यातील तरुण दिसेनासा झालेला.)

**बाई** होशमंदी या धनी, माजं यवढं काम करा—

**भल्या** रखमा, तुझ्या पोराला दिवाणबहादुर बुंदवाड ष्टेट, दख्खनचा कायदेशीर वारस केलं जात आहे. आमची सगळी स्थावर जंगम इष्टेट, डागडागिने आणि रहात्या चौसोपी वाड्यासकट, त्यालाच मिळेल. कंबख्त जावयाला बसू दे बोंबलत दोन हातांनी. कार्टीला म्हणावं तंबूरा धर त्याच्या मागं. निकम्मा गवई कहींका...(मिशीवर ताव मारीत) दिवाणबहादुर भलौजी त्र्यंबक कुळकर्णी, रिटायर शिबंदी कामगार, बकल नंबर दोसौ आठरा.

**चोर** (लॉकपमधून) दिवाणबहादुर नव्हं काका, साधा कनिष्टेबल—

**भल्या** (लावणीचा मुरका घेण्याचा एक बेसुरा प्रयत्न करीत रहातो.) माथ्यावरी–चंद्र की ग...की ग.. अग...ढळला ग...पोटात खाई पेटल्येय तिच्या मायला...कृष्ण्या, पातेलंभर मुर्गीचाप आणि वीसपंचेवीस चपात्या आण पैले. हणम्या, हरामजादे, बाटली गलास काढ. धोंड्या, बरफ सोडा आण आधी. व्हाईट हार्स रेड लेबल ओत तिच्या मायला...सोडा कमती...रम ओत त्यात...आज काकटेल हून्दे... माथ्यावरी ओहोहो...रखमा, प्यारी...तू पण घे थोडी, दिमाग तेज असू दे...आजची रात सपेशल झाली पाह्यजे.....

(चौकीच्या दारात तर्र भोसले. त्याच्या हातात रिव्हॉल्व्हर.)

**भोसले** (अत्यंत कर्कश आणि जड सुरात) दोनशे अठरा, काय तमाशा चाललाय गेटवर ?

(काका खडबडून अर्धवट जागृतीत येतो.)

**भल्या** (आवंढे गिळीत) त... तमाशा ... तमा ... ह... हुजूर...सर... सरकार...(उठवत नाही पट्दिशी. सांधे दगा देताहेत.)

**भोसले** खडा रहा.

(काका कसावसा उभा रहातो. चोर भेदरून लॉकपच्या कोपऱ्यात लपलेला. भिंतीशी बाई थरकापत उभी).

सलाम कर. सलाम कर डुकरा.

(काकाला याचा अर्थच कळत नाही.)

काय म्हणतोय थेरड्या, सलाम. पीके आये है हम...शूट करीन... शूट...( जड हाताने रिव्हॉल्व्हर सर्वभर फिरवतो. ) सलाम.

( काकाचा हात सलामाला काही केल्या वर जात नाही. मुद्रेवर घाम डवरून आलेला. मिशा थरथरताहेत. मग हात कसाबसा वर होऊ लागतो कष्टाने. )

( तेवढ्यात बाईकडे लक्ष जाऊन ) काय ग ए कुत्रे, इथं काय आहे तुझं ? छिनाल धंदे करायला दुसरी जागा नाही उरली का काय तुला ? नाक काय मुठीत धरतेस ? काय तुझा बा पीत नाही ? ( हात पकडून पिरगाळतो तिचा. ती कळवळून बोंब ठोकते. ) अजून ओरड, अजून. ( भेसूर हसतो. ) ओरड, ओरड. काय रे थेरड्या, मारू काय हिला ठार ? मारू ? एक बाई कमती होईल. सीधा खडा रहा. पोट आत, छाती पुढे. ऐकू येत नाही तुला, पोट आत, छाती पुढे. घालतो गोळ्या थेरड्या तुला, म्हणजे होईल सगळंच पुढे. चामडी लोंबवली पाहिजे एकेकाची, उलटे टांगले पाहिजेत. धुरी दिली पायजेल मिरचीची. खबरदार कोण हलेल तर, खबरदार. ( हातातले पिस्तुल चापावर बोट ठेवून चौफेर रोखतो आहे.) बाई तेवढी कुत्री. हरामी एकजात. लूतभरली सडकी कुत्री. शूट करो उसको. ( पुन्हा आंधळ्या अंदाजाने पिस्तुल फिरवतो. ) थेरड्या, सीधा खडा रहा. कान आहेत का भिंती ? चाळण करतो थांब तुझ्या म्हातारड्या अंगाची. लाह्याचं पोतं, फाडून टाकतो टरटरा. चले जाव. चले जाव रंडी, नाही तर धरतो पदर तुझा—

(बाई जिवाच्या कराराने गेटबाहेरच्या अंधारात तीरासारखी पळत निघून जाते.)

(तिच्या दिशेने दोन गोळ्या झाडून भेसूर हसत) कशी धावली कुत्री. बाईची जात, छिनाल. शिंदळ. (कसाबसा टेबलाकडे जातो. रजिस्टरची पाने उलटसुलट करतो. बघतो.) लाकपमध्ये एक पण केस नाही.

(लॉकपमधला चोर यासरशी अंग घट्ट चोरून कोपऱ्यात थरथरत लपलेला.)

काय रे थेरड्या घोड्या, ड्यूटी करता का हजामती ? तुला मारला पाह्यजे. थेरडी जीभ तुझी, तीन हात लांबवली पाह्यजे. लाकपमध्ये एक पण केस नाही ? ताठ खडा रहा. पोट आत, छाती बाहेर. (झिंगले हसतो.) सेनापती ! कमांडर इन चीफ !

**भल्या** (स्वतःच्याही नकळत ताड्‌दिशी) दिवाण.

**भोसले** तुझा बाप दिवाण. माझा बूट दिवाण. लाथ घातली पाह्यजे ढरीत ! दिवाण. (इकडे तिकडे बघतो झिंगल्याच नजरेने. खुंटीला होमगार्ड वापरतात तसली जाडजूड काठी दिसते ती कशीबशी आणून काकाच्या कमरेच्या पट्ट्यात कशीबशी कोंबतो. काकाचे फार हाल.) दिवाण, ही घे तलवार. (मग पुन्हा इकडे तिकडे बघून बाजूच्या लाकडी पेटीवरचे खंडीभर धुराळा साचलेले फाटके गोणपाट उचलून आणून काकाच्या गळ्याभोवती कसे तरी बांधतो. काकाच्या नाका-तोंडात धूळ जाते.) बढ गया रुबाब दिवाणका. (झिंगले हसतो. पुन्हा! इकडेतिकडे बघतो आणि कोपऱ्यातली कचऱ्याची टोपली दिसते. खूष होतो. कसा तरी जाऊन ती उचलतो आणि पायाखाली तुडवून बसकी करून काकाच्या डोक्यावर कचऱ्यासकट उलटी ठेवतो. काकाचे सोंग आणखीच केविलवाणे. पुन्हा भोसले जागच्या जागी तोल सावरीत इकडे तिकडे बघतो. टोपलीतल्या कचऱ्याबरोबर खाली पडलेले केळ्याचे साल उचलतो. ते काकाच्या डोक्यावरच्या बसक्या, उलटया टोपलीत तुऱ्यासारखे खोवतो. वर, बाजूच्या टेबला-वरची लाल शाईची दौत उपडी करतो. खदखदा हसतो.) दिवाण ! दिवाणबहादुर भल्याकाका !! (सलाम करतो लटका आणि कुचेष्टेचा. मग गंभीर होत) हम उप्पर है. डोळयात तेल घालून रहा थेरड्या. ड्यूटीत गडबड झाली तर उडवलाच तुझा गळा ! माणसातून उठवीन तुला, देशोधडी लावीन ! टाचा घासून मरावं लागेल ! वर आहे मी. घंटाभर डिष्टर्ब करू नको मला. (एका हातात रिव्हॉल्व्हर धरलेल्या स्थितीत कसावसा झोकांड्या खात वर निघून जातो.)

(काका सुन्न उभा. अंगावर भोसलेने दिलेला चमत्कारिक हास्यास्पद साज. त्यातही काका वजनदार, डिग्निफाइड वाटतो आहे.)

**चोर** (लॉकपच्या गजांशी आलेला. सगळे अंग थरथरते आहे भीतीने.) उपकार झाले तुमचे...

**भल्या** हडेरहप्प ?

**चोर** बरं झालं केस नोंद केली नाहीत. नाहीतर जिता फाडलान असता. गोळ्यांनी चाळणदिखील केली असती. नेम काय आज त्याचा ? अजून छातीत काळीज जागेवर नाही. वाटलं, येऊन बघतो का काय ? सध्या तरी जगलो. आता परतून खाली येल तेव्हा बचावलो का झालं.

आजचा दिवस पदरात पडला. आयुष्याची दोरी एका दिवसानं वाढेल. पण अजून सांगवत नाही. थंडगार पडलंय अंग. ते पिस्तुलच दिसतंय समोर. तो चाप...ती नळी...ते त्याचे लालभडक डोळे...ते हसणं. कुलदेवा, वाचव रे बाबा. जगलो वाचलो तर सोन्याची छत्री बांधीन तुझ्या डोक्यावर.

**भल्या** कोण आहे तिकडे ?

**चोर** यम. बसलाय येऊन वर.

(कुठून तरी दोन अरब कोपऱ्यात येऊन उभे. कुर्नीसात करतात.)

**भल्या** इनिसपेक्टर भोसल्याला जेरबंद करून परेड मैदानावर सरपटत दोन हजार फेऱ्या घालायला लावा. त्यानंतर तुमान काढून पाचशे फटके मारून पागेत मोतद्दार म्हणून चाकरीत ठेवून घ्या. हलकट असला तरी अन्नान्न दशा नाही येता कामा. पाठीवर मारावं, पोटावर मारू नये. म्हातारं वय वाईट असतं. जा. आमच्या फर्मानाची तामिली सांगितल्याबरहुकूम करा.

(अरब आले तसेच कुर्नीसात करून कुठे तरी नाहीसे होतात.)

**चोर** मरण आज चुकतच नाहीसं दिसतंय मला.

**भल्या** बावीसकर कारकून, फर्मानं काढा दोनचार. स्त्रीपार्टी गंगारामचा शोध लावून देणाराला नगद शंभर रुपये इनाम. सापडला तर वाड्यावर आणून चिकटवून द्या कुठे तरी. पोर मोठा गुणी होता, म्हातारं वय कठीण...फर्मान नंबर दोन : कंबख्त जावयाचा तंबूरा ताबडतोब सरकारजमा करून त्याला कोठीकडे भोपळे चिरण्याच्या कामात टाका. जावई म्हणून गय होता कामा नये.

**चोर** (घाबऱ्या घाबऱ्याच) हवालदार. अहो...शुत्...आता तरी रातभर जरा होषमधी रहा...मग करा दिवाणकी उद्या. काळ आलाय काळ वर...हवालदार...हवालदार...

**भल्या** आणखी बावीसकर, तात्या ऐरेकर आणिक रंगी सातपुते यांच्यावर सख्त नजर ठेवण्याची गुप्त आर्डर आपल्या विश्वासू माणसांना देऊन ठेवा...राहूकेतू एकत्र आलेत, लक्षणं बरी नाहीत...दांडा पुन्हा गुल होईल...खबरदार राहिलं पाहिजे...

**चोर** (घाबरल्याच स्वरात) लक्षण तुमचंच बरं नाही, हवालदार. अहो वेळ काय, नि तुम्ही हे चालवलंय काय ? कुठलं सौस्थान नि कुठलं काय...

दांडा खरंच गुल होणार अशानं.. तुमचा नि माझा, कुलदेवा, वाचीव. म्हातारं वेडं झालं...तो भोसल्या खाली आला तर...नाही, नको. त्याच्या हातचा मार खाऊन जिती मरण मरण्यापेक्षा असाच जीव गेलेला पत्करला.

(अंगावरच्या चमत्कारिक वेषानिशीच काका दिवाणाच्या जबाबदार आणि धीरगंभीर तोऱ्यात खुर्चीत येऊन स्थानापन्न झालेला. दुतर्फा कोणी त्याच्याशी खलबते करीत असावेत तशा गंभीरपणे माना हलवतो, वजनदार पण खोटे स्मित करतो, काही काही स्वीकारून बाजूला ठेवतो. काही संशयाने नाकारतो. मधून मधून कुणाकुणाचे मुजरे परत करतो. मग जणू कुणी तरी देत असलेली गुप्त खबर ऐकू लागतो, वाढता अस्वस्थ होतो. तिकडे लॉकपमधून चोर भेदरल्या कापऱ्या स्वरात, हजारो मैलांवरून कराव्या तशा काकाच्या विनवण्या करतो आहे, त्याला पुन्हा पुन्हा हाका घालतो आहे.

काका आता भयंकर अस्वस्थ झालेला. त्याचा दिवाणाचा रुबाब पोकळ होऊ लागतो.

पाहता पाहता काका जख्ख म्हातारा, उदास, मूढ, संशयग्रस्त दिवाण होऊन खुर्चीच्या कोपऱ्यात अंग आखडून पाठीत पार वाकून बसून राहतो. डोळ्यांवर झापड. डोक्यात वेड. चेहरा तारवटलेला.

आता मागे पोलिस बँडपैकी ड्रम कडकपणे वाजू लागतो. कोंबडा वाजू लागतो. किरट्या पुरुषी आवाजात कुणीतरी लष्करी हुकूम सोडू लागतो. प्रत्येक हुकुमासरशी शेकडो सैनिकांच्या शिबंदीचे बुटांचे एकसाथ आवाज घुमू लागतात. मग ड्रमच्या लयीत परेड चालू होते. अस्वस्थ, तारवटला, थकला काका प्रथम एकदम हुशारतो. ताठ होतो. छाती फुगते. तो उठतो. त्या आवाजाच्या दिशेने पाहू लागतो. किरटे हुकूम चालूच. कवायत चालू. काका पुन्हा अस्वस्थ होऊ लागतो. मनस्वी कुचंबतो. काकाची कुचंबणा शीग गाठते.

आणि शिंग वाजते. उंच आणि स्वच्छ स्वर. सगळे इतर आवाज लांब जातात. ड्रमची संथ लय सुरू होते. प्रथम अस्पष्ट, मग स्पष्ट, त्या लयीत मानकरी पहिल्या अंकाप्रमाणेच येतो. मागे सरकारस्वारी नाही. काका जागचा उठलेला.

मानकरी हातची लांबलचक गोंडेवाली सनंद उलगडून वाचू लागतो. यावेळी त्याचे शब्द ऐकू येण्याऐवजी एक आनंद-दर्शक वेडे पार्श्वसंगीत रंगमंच भरून टाकते.

काकाच्या मुद्रेवर कधी नव्हता असा वेडा हर्ष. सर्व वाचून मानकरी उलगडलेला कागद पूर्ववत गुंडाळतो. ड्रमच्या लयीत पावले टाकीत निघून जातो. काकाच्या मुद्रेवर मूर्तिमंत बेहोषी. कुडीत अनावर ताठा.)

**भल्या** ( लटपटत उभा. जीव खाऊन ओरडतो ) हडेर–हप्प.

(विलक्षण शांतता.)

( हर्षभरित सुरात आता कवायतीतले हुकूम फर्मावू लागतो आणि शेकडो, हजारो बुटांचे एकसाथ कडक, आज्ञाधारक आवाज होऊ लागतात. काका आणखी हुकूम फर्मावतो. आवाज होत राहतात आता हर्षाने वेडावल्या स्वरात) रखमा, प्यारी, श्रीमंत सरकार हुजूरनी कृपा केली आणि आम्ही फिरून दिवाणाचे शिबंदी–कामगार झालो ! प्यारी, आखिर जीत लिया हमने जो खींच लिया था हमसे निकम्मे होम डिपार्टमेंटने. आखिर जीत हुई हमारी, प्यारी. शिबंदी कामगार भलोजी त्रिंबक कुळकर्णी, माजी दिवाणबहादुर बुंदवाड, दख्खन. प्यारी, सगळं पावलं आपल्याला, सगळं पावलं. (हसू लागतो खदखदा. मध्येच हुकूम फर्मावतो भडाभडा. शिबंदी कामगाराच्या रुबाबात मध्येच स्टेजभर फिरू लागतो. पुन्हा राक्षसी हसू लागतो.)

(काळोख.)

उजेड. तीच पोलिस–चौकी. आता पोलीस चौकीच वाटते. तिच्यात अनेक पोलिस. दोन इन्स्पेक्टर्स. लॉकपशी डी. एस्. पी. प्रेक्षकांना पाठमोरा लॉकपमध्ये पाहत उभा. खुर्चीत काका निपचित जड डोळ्यांनी बसल्या बसल्या लोळलेला. डोक्या-वर टोपली नाही, बाकी वेष भोसलेने रात्री दिलेलाच.)

**डी.एस्.पी.** (लॉकपकडून येत) क्लिअर केस ऑफ सुइसाइड. गळफास लावून घेतलाय कैद्यानं. (काकाकडे येऊन) म्हाताऱ्याला पुन्हा जागा करून पाहा. पाणी मारा तोंडावर.

( कॉन्स्टेबल्स तसे करतात. काका मुष्किलीने थोडा जागृतीत येऊ बघतो.)

**१ इन्स्पे.** नंबर दोनशे अठरा, गेटप. दोनशे अठरा, खडा रहा. ऊठ दोनशे अठरा.

(त्याला धरून वळेवळे उभाच करतात. सोडताच पुन्हा तो लटपटून खचू पाहतो. त्याला एक इन्स्पेक्टर मागून हातच्या छडीचा टेकू देतो. काका कसाबसा त्या आधाराने उभा. मुद्रा पार झोपाळलेली आणि भ्रमिष्ट.)

**मल्या** क्या है . हडेरहप्प. तमाशा बरखास्त.

**इन्स्पेक्टर** दोनशे अठरा, जागा हो. (पुन्हा पाणी मारतात.)

(काकाला किंचित् अधिक जागृती.)

**१ कॉन्स्टे.** म्हातारं जागं झालं वाटतं.

**डी.एस्.पी.** इन्स्पेक्टर, लेट हिम बी नाव्.

( काका सुन्न उभा. )

दोनशे अठरा, जागा झालास ? रात्री लॉकपमधी कैदी केव्हा घातलास ?

( काका सुन्न उभा. )

रात्री लॉकपमधी कैदी घातलास केव्हा ? कोण होता तो ? लॉकपला लॉक का नाही लावलंस ? केस डायरीत का नाही नोंदवली ? कैद्याला हँडकफ्स का घातले नाहीत ? गळफास केव्हा लावून घेतला त्यानं; दोनशे अठरा ? त्यानं गळफास लावून घेतला तेव्हा तू काय करीत होतास ?

( काका सुन्न उभा. )

**२ कॉन्स्टे.** काय कळेनासंच झालंय साहेब म्हाताऱ्याला.

(जिन्यावरून एक हेडकॉन्स्टेबल खाली येतो.)

**हेडकॉन्स्टे.** (सलाम करून) साहेब; वरचा पंचनामा कम्प्लीट झाला. मोहितेसाहेब विचारतात भोसलेसाहेबांची बाडी खाली आणायची का गाडीची वाट बघायची ?

**डी.एस्.पी.** वर असू दे. रिव्हॉल्व्हर सील केलं ?

**हेडकॉन्स्टे.** होय साहेब. सात काडतुसं मिसिंग आहेत. त्यातल्या चारांचा ट्रेस लागतोय कपाळात.

**डी.एस्.पी.** आय सी...अलीकडे लक्षणच दिसत होतं भोसलेचं. गैरवागणुकीचे आणि दारूबाजीचे फार रिपोर्ट होते.

**इन्स्पेक्टर** घरचा ट्रबल होता, साहेब. बायको वाईट चालीची होती. डेली मगजमारी असायची ती त्याला. काल पळाली. तेव्हापासून भलताच आऊट होता.

डी.एस्.पी. हूं...या खालच्या कैद्यानं त्याच्याच धास्तीनं जीव दिला असला पाहिजे. हे आमचेच लोक असे वागतात आणि पोलिस फोर्सला बट्टा लागतो. (इन्स्पेक्टरला) जगदाळे, गार्डी आल्यावर बॉड्या मॉर्गकडे जाऊ देत. म्हाताऱ्याला कस्टडीत ठेवा सध्या. आणि तुम्ही आठला फोन करा मला. मी निघतो.

(सगळे डी. एस्. पी. ला कडक सलाम ठोकतात. काका ताठ उभा राहून सलाम घेतो. काकाकडे पहात डी. एस्. पी. निघून जातो. त्याची कार निघून गेल्याचा आवाज. काका ताठ उभाच.)

इन्स्पेक्टर (कॉन्स्टेबलसना) त्याला टाका जीपमध्ये. हॅंडकॅप्सची गरज नाही.

(कॉन्स्टेबल्स काकाला दोन्ही बाजूंनी, कैद्याला धरावा तसा धरतात काका ताठ. ते त्याला खेचतात. काका हिसक्याने सोडवून घेतो स्वत:ला. दोन्ही कॉन्स्टेबल्स हेलपाटलेले. आता काका अस्सल शिबंदी कामगाराच्या ताठ्यात स्वत:च चालत चौकीबाहेर निघून जातो. मागून कॉन्स्टेबल्स आणि इन्स्पेक्टर्स. बाहेर अजून काळोख. लांबवरून अशक्तपणे भजन ऐकू येते आहे, 'याचसाठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिस...' काळोख )

( पडदा )

□ □ □

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. ..१८८७६.. नों. दि. २०।९।९
वि. ...नाटक...... क्र. ..................

IRBK-0118876

IRBK-0118876